विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१६ |
| वर्ष | : | पन्नासावे |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१६**

**गणपत्रिका क्रमांक : १८६**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : पन्नासावे, अंक : चौथा मार्गशिर्ष/पौष शके १९३७, जानेवारी २०१६

## संपादकीय

## भारतीय राज्यघटना आणि बिचारा मनु

दरवर्षी २६ नोव्हेंबर हा 'संविधान' (घटना, Constitution) दिवस म्हणून साजरा करण्याचे आदेश भारत सरकारने दिले आहेत. २०१५ हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष आहे. ११ ऑक्टोबर २०१५ ला मुंबई येथील इंदु मिलच्या जागेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणार्थ बांधण्यात येणाऱ्या संकुलाचा शिलान्यास करतांना ही घोषणा आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केली. या आधी २६ नोव्हेंबर हा विधि दिवस (Law day) म्हणून साजरा करण्यात येत होता. पंतप्रधान मोदींनी याचवेळी (शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०१५) लोकसभेमध्ये निक्षुन सांगितले की, "For the government, the only 'dharma' is India First, the only 'dharma granth' (holy book) is the constitution." (शुक्रवार, २७ नोव्हेंबर, द हिंदू). ७० मिनिटे दिलेल्या पंतप्रधानांच्या भाषणात या विषयावर बरेच काही सांगितले गेले.

भारताच्या घटनेसंदर्भात जे अनेक 'समज' आणि 'गैरसमज' आहेत त्यामध्ये या विधानामुळे भरच पडणार आहे. 'धर्म' आणि 'पंथ' या संकल्पनांची गफलत ही भारतीयांना तरी नवीन नाही. हिंदू धर्म सोडून बाकी सगळ्या पंथांना 'चौकटीत' बांधता येते किंवा त्यांची 'व्याख्या' करता येते. त्या सगळ्यांचा एक 'प्रेषित' असतो, आणि स्वतःचा असा एक 'पवित्र' ग्रंथ असतो. म्हणूनच त्या पंथांच्या अनुयायांना 'प्रेषित' आणि 'पवित्र' ग्रंथाच्या परीघामध्ये आपले सगळे व्यवहार करावे लागतात. सृष्टीच्या निर्मितीपासून, सर्व तत्वज्ञान आणि संकल्पनांना या परिघात बांधून ठेवावे लागते. ख्रिस्ती आणि इस्लाम पंथीयांमध्ये अनुक्रमे 'बायबल' आणि 'कुराण' यांना 'पवित्र' (holy) ग्रंथ म्हणून संबोधण्यात येते. 'पवित्र' म्हणून जेव्हां एखाद्या ग्रंथाला संबोधण्यात येते तेव्हा हा संदर्भ लक्षात ठेवावा लागतो. 'हिंदू धर्म' हा एकच असा 'धर्म' आहे की, तो या चौकटीत बसू

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| **बँक** | **शाखा** | **खाते क्र.** | **बँक IFSC कोड** |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | **10884930955** | **SBIN 0009056** |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | **002115000024520** | **TBSB 0000002** |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

<u>देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.</u>

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **<u>फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.</u>**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे४००६०१. दूक्र : २५४७२००५, भ.क्र:९८१९६९३१९५
अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| श्रीमच्छंकराचार्यविरचितं द्वादशज्योतिलिङ्गस्तोत्रम्। उज्जयिन्यां महाकालम्। | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ४- युगपुरुष | ६ |
| वामनाची गोष्ट | ९ |
| श्रीगणेश उपासेनेचे सर्वश्रेष्ठत्व | १६ |
| ईशावास्थमिदं सर्वं। | १९ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्र - 'राष्ट्र संकल्पना' | २७ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ५० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

**देणगी ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५**

श्री. विष्णू ह. पाटील, नाशिक - रु. १,०००/-

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

कुलकर्णी अप्पराव अनंतराव, लातूर

भोपटकर विवेक श्रीराम, देवरुख

परचुरे शिल्पा मिलिंद, मिरज

**- संपादक**

लेख २५ वा

**दुष्करं किं महात्मनाम्?**

मोठ्यांसाठी ह्या जगात कोणती गोष्ट अवघड आहे? (अर्थात कोणतीच नाही)

संपूर्ण सुभाषित -

**उक्तिरर्थान्तरन्यासः स्यात्सामान्य विशेषयोः।**
**हनुमानब्धिमतरद् दुष्करं किं महात्मनाम्?**

अर्थान्तरन्यास ह्या अर्थालंकाराची ही व्याख्या आहे. सामान्य नियमाचे विशिष्ट गोष्टीने समर्थन करणे. हनुमान समुद्र पार करुन गेला ही विशिष्ट गोष्ट 'मोठ्यांना काहीच कठीण नसते' ह्या सामान्यनियमाने समर्थित केली आहे. अनुष्टुब छंद.

गुणवद्वस्तुसंसर्गात् याति स्वल्पोऽपि गौरवम् ।[३२९] गुणवान वस्तुच्या सहवासामुळे सामान्य वस्तूलापण महत्त्व येते. दुसरा अर्थ - गाडी बरोबर नळ्याला पण यात्रा घडते.

संपूर्ण सुभाषित -

**गुणवद्वस्तुसंसार्गात् याति स्वल्पोऽपि गौरवम्।**
**पुष्पमालानुषंगेण सूत्रं शिरसि धार्यते ।।**

श्लोकाच्या पहिल्या ओळीत सामान्य नियम दिसून येतो व त्याला पुष्टी देण्यासाठी दुसऱ्या ओळीत उदाहरण दिल आहे. फुलांचा गजरा वेणीत घालतात. दोऱ्याला त्यामुळे उच्च स्थान मिळते. सहवासामुळे योग घडू नयेणे ह्याचे उदाहरण मराठी म्हणीत मिळते. यात्रेकरु बैलगाडीने यात्रेला जातात त्यावेळी बैलगाडीच्या चाकांना ओंगण (ग्रामीण शब्द वंगण) घालण्यासाठी वापरलेल्या तेलाचा एक नळा गाडीला बांधलेला असतो. गाडी जिथे जाते तिथे तो आपोआप जातो. हे उदाहरणसुद्धा अर्थान्तरन्यासाचेच आहे. छंद पण अनुष्टुभ आहे.

**पश्यति पित्तोपहतः शशिशुभ्रं शंखमपि पीतम्।** [३३०]

कावीळ झालेल्या माणसाला सर्व वस्तू पिवळ्याच दिसतात.

संपूर्ण सुभाषित -

**निजन्दोषावृत-मनसाम् अतिसुन्दरम्**
**एव भाति विपरीतम्।**
**पश्यति पित्तोपहतः शशिशुभ्रं**
**शंखमपि पीतम् ।।**

स्वतःच्या दोषामुळे ज्याचे मन कलुषित झाले आहे अशा माणसाला अत्यंत सुंदर वस्तू देखील असुंदरच दिसू लागतात. कावीळ झालेल्या माणसाला चन्द्रप्रकाशा सारखा शुभ्र शंख देखील पिवळाच दिसू लागतो

**गृहिणी गृहमुच्यते।**[३३१]

घराला घरपण हे त्यात असलेल्या गृहिणी मुळेच येते.

संपूर्ण सुभाषित -

**न गृहं गृहमित्याहु : गृहिणी गृहमुच्यते ।**
**गृहं तु गृहिणीहिनं कान्तारादति रिच्यते ।।**

सुभाषितकाराने गृहिणी परमोश्च मानून इतर सर्वांना त्यातून वगळून टाकले आहे. त्यामुळे येथे

(पृष्ठ २८ वर)

## उज्जयिन्यां महाकालम् ।

**अवन्तिकायां विहितावतारं**
**मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम् ।**
**अकालमृत्योः परिरक्षणार्थं**
**वन्दे महाकालमहासुरेशम् ।।**

अन्वय : सज्जनानां मुक्तिप्रदानाय (येन) अवन्तिकायां अवतारं विहितं (तं) महाकालं, महासुरेशम् अकालमृत्योः परिरक्षणार्थम् (अहं) वन्दे ।

**शब्दार्थ** : **सज्जनानां** - सन्तः जनाः सज्जनाः तेषाम् सज्जनांच्या

**मुक्तिप्रदानाय** - मुक्तेः प्रदानं तस्यै । मुक्त देण्यासाठी.

**अवन्तिकायां** -उज्जयिनी नगरात, मध्य प्रवेशात क्षिप्रानदीच्या काठी असलेल्या शहरात.

या शहराला पूर्वी बरीच नावे होती. इन्द्रपुरी, अमरावती, स्वर्णशृंगा (म्हणजे ज्या नगरीतील देवळांचे कळस सोन्याचे आहेत अशी).

त्या काळात ह्या नगरीला बहुरत्ना असे विशेषण लावीत असत. कारण ह्याच नगरीत संस्कृत वाङ्मयातील दिग्गज लेखक व कवी होऊन गेले.

सुप्रसिद्ध गद्यलेखन करणारा बाणभट्ट यांने कादंबरी व हर्षचरित हे महानग्रंथ लिहिले. शूद्रक ह्याचे मृच्छकटिक प्रसिद्ध आहे. कालिदासाची रघुवंश, कुमारसंभव ही महाकाव्ये व ऋतुसंहार आणि मेघदूत महाकाव्ये ह्याचे नगरीत लिहिली गेली. शकुंतलाचे नाव माहीत नाही असा कोणी नसेल. कथासरित्सागराचा कर्ता सोमदेव आणि प्रख्यात ज्योतिषगणितज्ज्ञ वराहमिहीरही इथेच होऊन गेले. असा ह्या उज्जयिनी नगरीचा महिमा आहे व महाकाळामुळे तिचे महत्त्व उच्चकोटीला गेले आहे.

**महाकाळः** - महान् कालः महाकालः । शंकराने महाकाळाचे रुप 'दूषण' नावाच्या अतीदुष्ट राक्षसाला ठार मारण्यासाठी घेतले होत अशी आख्यायिका आहे.

**महासुरेशम्** -सुराणाम् ईशः सुरेशः देवाधिदेव । महान् सुरेशः महासुरेशः तम् । देवाधिदेवाला

**भावार्थ** - शंकराचार्य म्हणतात - सज्जनांना जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती देण्यासाठी, राक्षसांसारख्या दुष्टप्रवृत्तींपासून रक्षण करण्यासाठी ज्याने अवंतिका म्हणजे उज्जयिनी नगरीत अवतार घेतला अशा त्या देवाधिदेव महाकाळाला अकाल मृत्यूपासून वाचण्यासाठी मी वंदन करतो.

उज्जयिनी येथे महाकाळाचे अत्यंत भव्य मंदीर आहे व ते पुरातनकाळापासून १२ ज्योतिर्लिङ्गांपैकी एक आहे. इति शम् ।

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

## 'सुवर्णनगरी द्वारका'- जाती गोपालन

जागा कुशस्थली सागरजले पुनीत
आंदोळत लाटा सागरतीरी जात
वृक्षांच्या मधुनी मंद वाहतो वात
तेथे / ऐसे कृष्ण करी नगर उभे झोकात ॥ धृ ॥

भूमीस पूजले शुभ मुहूर्त पाहीला
श्रेष्ठांच्या हस्ते बसे तटाची शीला
नाना देशींचे शिल्पकार कामाला
येती दाखविण्या हस्तकला नगरीत ॥ १॥

वाडे वीरांचे वसण्या उत्तम केले
सोन्याचे पत्रे नगर तटा बसवीले
कारंज्यांनी पथ भव्य सुशोभित झाले
संपन्न तेथली बाजाराची पेठ ॥ २ ॥

कोटाच्या पुढती खंदक खणला जाई
पाण्याने तोही भरला सदैव राही
दृग्गोचर शोभा त्यात फुलांची होई
खाली तळ पहुडे लोखंडी काटयांत ॥ ३ ॥

सिंहासनि हरिने वसुदेवा बसवीले
भ्रात्या बलरामा हो युवराजच बोले
कित्येक वीर ते राजभूषणे ल्याले
सांदीपनि पाहति त्या नगराचे हीत ॥ ४॥

श्रीकृष्ण आपणा ना कुठले पद घेत
सत्कार्या करुनी सतत अलिप्त रहात
शंका नच येई तरिही लोकमनात
साऱ्या जगताचा तोच एकला नाथ ॥ ५॥

श्रीकृष्णाचा ऐन रणांगणात पराभव करून त्याला ठार मारण्याच्या जरासंधाच्या सर्व प्रयत्नांना दारूण अपयश आलं. मग दुधाची तहान ताकावर तरी भागवावी या हेतूनं त्यानं रुक्मिणीचा बंधू आणि कुंडिनपुराचा युवराज रुक्मी याच्याशी संधान बांधलं. कृष्णाला अत्यंत प्रिय अशा त्या रुक्मिणीचा विवाह चेदिपती शिशुपाल याच्याशी लावला तर तो कृष्णाचा फार मोठा पराभव ठरेल याची त्याला पूर्ण कल्पना होती. म्हणूनच रुक्मीच्या मध्यस्थीनं परस्पर आततायीपणा करून रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी ठरला आहे असं त्यानं जाहीर केलं. कुंडिनपुरचे राजा भीष्मक यांनी केवळ संघर्ष टळावा म्हणून या विवाहाला मान्यता दिली.

झालं! लागलीच जरासंध रुक्मीकरवी विवाह ठरल्याच्या निमंत्रणपत्रिका अखिल ब्रह्मावर्तात वाटून मोकळाही झाला. कृष्णाच्या जखमेवर मीठ चोळावं म्हणून आवर्जून एक कुंकुमपत्रिका द्वारकेलाही जाईल याची त्यानं व्यवस्था केली!

ती कुंकुमपत्रिका हातात येताच श्रीकृष्णाचं मन अत्यंत उद्विग्न झालं. लग्नाच्या तिथीला आता फक्त तीनच दिवस उरले होते. जड हृदयानं आणि जड पावलांनी द्वारकेतल्या आपल्या भव्य प्रासादात कृष्ण येरझारा घालत होता. त्याला एकच प्रश्न छळत होता. काय करावं? काय करावं? एवढ्यात सेवकानं आत येऊन त्याला सांगितलं, महाराज, कुंडिनपुराहून एक वृद्ध ब्राह्मण आपल्यासाठी एक पत्र घेऊन आले आहेत.
हे ऐकताच कृष्णाच्या शरिरातून एक विजेची लहरच जणू चमकून गेली. पराकाष्ठेच्या आतुरतेनं

त्या ब्राह्मणाला पाचारण करण्याची त्यानं सेवकाला आज्ञा केली.

त्या वृद्ध ब्राह्मणानं आल्याआल्या ते पत्र कृष्णाहाती सोपवलं आणि तो म्हणाला, श्रीकृष्णा, वेळ अगदी थोडा आहे. मला पुत्रीवत असलेल्या राजकन्या रुक्मिणीचं हे पत्र आपण ताबडतोब वाचावं आणि लागलीच योग्य ती कृती करावी.

अंगावर रोमांच उभे राहिलेले आहेत, हृदयात अवर्णनीय प्रेमभावना उचंबळून आलेल्या आहेत, शरीर कंपायमान होतं आहे अशा अवस्थेत कृष्णानं ते पत्र उघडलं आणि त्यातील मजकुरावरून झरझर नजर फिरवायला सुरूवात केली. मंडळी, कृष्णाच्या खांदयावरून डोकावून आपणही ते पत्र हळूच वाचू या!

श्रुत्वा गुणान्भुवनसुंदर शृण्वतां ते
निर्विश्य कर्णविवरैर्हरतोऽङ्गतापम्
रूपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं
त्वय्यच्युताविशति चित्रमपत्रपं मे

**'रुक्मिणी पत्रलेखन' - जाती अंजनी**

युगायुगांची आस मनीची मजला तारावे
श्रीयदुनाथा सत्वरि आता हरण्या मज यावे ॥ धृ ॥

पत्र नसे हे हृदयस्पंदने
लिहिता माझी झरति लोचने
आगंतुकता क्षमून देवा
प्रेमा समजावे ॥ १॥

स्मरता अपुल्या लोभस रूपा
जीव विसरती या भवतापा
तुमच्या योगे सकळ दीनते
दिगंतरा जावे ॥ २ ॥

त्रिभुवनसुंदर वीरा वरले
मी आनंदे व्रत आचरले
सोडुन कृष्णा ना अन्यांचे
गीत कधी गावे ॥ ३॥

प्राण अर्पिण्या तुमच्या चरणी
सिद्ध मी जरी लय हो धरणी
सर्वहि संगा त्यजता का मी
लज्जेसि धरावे ॥ ४॥

खादयाला त्यजताच केसरी
झडप घालती जंबुक भारी
शिशुपालादिक दुष्टमतींना
शौर्ये वारावे ॥ ५॥

आज मन्मनी एक कामना
लग्नाआधी देविदर्शना
येता मीही मजसि श्रीहरी
वेगाने न्यावे ॥ ६ ॥

तेज अर्णवी ज्योती मिळु दे
मीलन होता मीपण नुरु दे
आत्म्याने परमात्मस्वरुपा
खेव सुखे दयावे ॥ ७ ॥

मान्य नसे जरि माझी विनती
वज्रलेख लिहिते मजहाती
जीवाने या त्यागुनि काया
पुन्हा जन्म घ्यावे ॥ ८ ॥

पंचप्राण ते ठेवुनि नयनी
बघते भीष्मक राजनंदिनी
मार्गा कृष्णा त्वरित येउनी
ब्रीदा राखावे ॥ ९ ॥

पत्र वाचता वाचताच श्रीकृष्णाचा निर्णय

पक्का होत गेला. दुसऱ्यांदा काळजीपूर्वक पत्र वाचून तो त्या वृद्ध ब्राह्मणाला म्हणाला, द्विजराज, आपण आज विश्रांती घ्यावी. उदया पहाटे ब्राह्ममुहूर्तावर आपण कुंडिनपुरास निघू.

सर्व रात्र कृष्ण या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता. अखेर पहाट झाली. कृष्णानं बलरामासाठी निरोप ठेवला आणि ब्राह्मणासमवेत कुंडिनपुरास तात्काळ कूच केलं.

कुंडिनपुरात जरासंध पक्षियांचा उत्साह ओसंडून वहात होता. शिशुपालाला तर रुक्मिणीचं पाणिग्रहण करण्याच्या नुसत्या कल्पनेनंच आनंदाच्या उकळया फुटत होत्या. आणि हे आपण आपला कट्टर वैरी कृष्ण याच्या नाकावर टिच्चून करतो आहोत ही जाणीव त्या आनंदाला अधिक गडद बनवत होती. जरासंधानं आपल्याबरोबर अनेक प्रकारचे आहेर आणले होते. खुद्द रुक्मी जातीनं वऱ्हाडाची उठबस करत होता. मधुनच सर्वांच्या मनात कृष्णाची आठवण होऊन भितीची एक शिरशिरी येऊन जाई. त्या शिरशिरीवर मग ते उत्साहाचं उबदार पांघरूण घालत होते.

रुक्मिणीचं दुष्ट मन तिला पत्र लिहिल्याबद्दल, कुलमर्यादेची लक्ष्मणरेषा ओलांडल्याबद्दल बोल लावत होतं. त्या पत्राचा काहीच उपयोग होणार नाही असं बजावत होतं. ती एखादया कळसूत्री बाहुलीप्रमाणं सारे सोपस्कार करवून घेत होती. कोणत्या मार्गानं आपला प्राणत्यागाचा संकल्प पूर्ण करावा याचा विचार करत होती.

आणि अचानक कृष्ण कुंडिनपुरात येऊन पोहोचल्याची वार्ता सर्वतोमुखी झाली. रुक्मिणीला तर स्वतः त्या वृद्ध ब्राह्मणानंच येऊन ही बातमी दिली! ते ऐकताच ती हर्षातिशयानं वेडी झाली. आसवांनी त्याची पाऊलं धुवून काढीत वारंवार विचारू लागली, तात, तुमच्या या ऋणातून कशी बरं मी मुक्त होऊ?

तो ब्राह्मणही सद्‌गदीत होऊन तिला आशीर्वाद देत म्हणू लागला, मला सर्व भरून पावलं मुली.

कृष्णाचा निरोप मिळताच बलराम लागलीच यादवसैन्याला बरोबर घेऊन कुंडिनपुरात कृष्णापाठोपाठ येऊन पोहोचला. गिरिजेच्या देवळाजवळच्या उद्यानातच त्यांनी तळ ठोकला. ते वृत्त कळताच रुक्मिणीला कुलरीतीनुसार लग्नाआधी देविच्या दर्शनाला न्यावं की नाही असा रुक्मी आणि जरासंध पक्षियांना प्रश्न पडला. पण तसं केल्यास स्वतःच्या शौर्यावर अविश्वास दाखवून कुलरिती मोडल्यासारखं होईल हे भीष्मकानं त्यांच्या लक्षात आणून देताच नाईलाजानं गिरिजादर्शनाचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणं उरकावा असा निर्णय त्यांना घ्यावा लागला. मात्र देवालयाभोवती मुंगीलाही शिरण्यास वाव मिळणार नाही असा कडेकोट बंदोबस्त करण्यात आला. देवळाच्या आसपासच्या परिसराला त्यादिवशी अक्षरशः सैनिकी तळाचं स्वरूप प्राप्त झालं...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

### सत्प्रवृत्तींची जोपासना आश्रमांत

नाभानेदिष्ठाची गोष्ट ऐकल्यापासून वामनाला सूक्तकर्त्या ऋषींबदल अधिकच आकर्षण वाटूं लागले. कोणत्याही नवीन ऋषीचें सूक्त पाठांत आलें की तो त्या ऋषीची माहिति विचारी. काश्यपही ती त्याला कौतुकानें सांगे.

आज अगस्तिऋषीच्या एका सूक्ताचा पाठ चालू होता. तो संपल्यानंतर वामन पित्याला म्हणाला, ''तात, ह्या ऋषीची तडफ काही वेगळीच दिसते, नाही?''

काश्यपानें उत्तर दिलें, ''होय पुत्रा, अगस्तिऋषि अत्यंत धाडसी होता. त्याला ह्या दक्षिणापथ देशाचा जनकच मानलं पाहिजे.''

हे ऐकून वामन आश्चर्यानें म्हणाला, ''काय, दक्षिणापथ एका ऋषीनें बनविला? तात, तर मग मला त्याची गोष्ट सांगाल का?''

''बाळा, ऐक.'' असें म्हणून काश्यप अगस्तीची हकीकत सांगू लागला. तो म्हणाला, ''बाळा, उत्तरेस गंगानदीच्या खोऱ्यांतील वस्ति बेसुमार वाढली. धनधान्याचा तुटवडा पडू लागला. शेतीला भूमि पुरेना. अधिक भूमि न मिळाल्यास, उत्तरवासीयांना शांतिमय जीवन जगणं अशक्य होईल असं स्पष्ट दिसू लागलं.

''दक्षिणेंत अरण्यंच्या अरण्यं ओसाड पडलेलीं होतीं. पण तिथें जायचं कसं? वाटेंत विंध्य पर्वत आडवा येत होता.

''कैकजणांनी तो ओलांडण्याचा प्रयत्न केला. पण कुणालाही यश आलं नाही. अनेक साहसी वीर वाटेंतच मृत्युमुखीं पडले.

''विंध्याच्या त्या खोल खोल दऱ्या आणि ते उंच उंच सुळे पाहिले कीं हा कोणी महाभयंकर राक्षस जबडा पसरुन आपल्याला गिळण्यासाठीं मार्गांत उभा आहे असं वाटे.

सर्वांना विंध्याची दहशत बसली.

अशा परिस्थितींत अगस्तिऋषी प्राणांचीही पर्वा न करतां उत्तरेहून निघाला आणि अपरंपार कष्ट सोसून त्यानें विंध्य ओलांडला आणि गंगाखोऱ्यांतील लोकांना खालीं दक्षिणेंत येण्याचा मार्ग दाखवून दिला.

''पण लोक भूमीसाठीं जरी हपापलेले होते तरी त्याच्या मागून खालीं येण्यास कोणीही धजेना.''

हें ऐकून वामनानें पित्याला विचारलें, ''तें कां?''

काश्यप म्हणाला, ''कारण त्या काळीं येथील अरण्यांत अत्यंत हिंस्र अशी नरभक्षक माणसं वावरत असत. त्यांनाच राक्षस म्हणतात. बाळा, गंगाखोऱ्यांतले लोक त्या राक्षसांना फार घाबरत होते. तेव्हां त्यांना हिंमत देण्यासाठीं म्हणून अगस्ति एकटाच पुढें आला आणि त्या अरण्यांत स्थायी झाला. त्यामुळें मग इतरांना धीर येऊन ते त्याच्या मागोमाग आले. अशा प्रकारें अगस्तिनें हळूहळू येथें वसाहत स्थापन केल्या.''

वामन आतां रंगला होता. त्यानें पित्याला प्रश्न केला, ''तात, इथें वसाहती स्थापन केल्यावर मग अगस्तीनें काय केलं?''

काश्यप म्हणाला, ''बाळ, मग त्यानें इथें आपला आश्रम स्थापन केला.''

वामनानें लगेच प्रश्न केला, ''तो कशासाठीं?''

काश्यपानें उत्तर दिले, ''बाळ, फार चांगला प्रश्न विचारलास. अगस्ति ऋषीच्या चरित्राचं रहस्य त्यांतच भरलेलं आहे. ऐक.''

''बाळा, अगस्ति वेदांचा अनुयायी होता. सर्वचराचर वस्तूंत परमेश्वर व्याप्त असल्यामुळें अखिल प्राणिमात्राबद्दल एकात्मता वाटूं द्या आणि यज्ञ करून शांततेने नांदा व आपला उत्कर्ष करून घ्या, ह्या वेदांच्या शिकवणीवर त्याची पुरती श्रद्धा होती.''

वामनानें मध्येंच प्रश्न केला, ''पण तात, यज्ञानें शांति कशी लाभणार? त्याचा मानवाच्या उतकर्षाशीं काय संबंध?''

काश्यपानें लगेच उत्तर दिलें, ''बाळ, यज्ञ म्हणजे त्याग. आपण यज्ञकुंडांत आहुति टाकतों तें त्यागाचं केवळ एक बाह्य प्रतीक आहे. त्या प्रतीकाच्या द्वारा 'त्याग करा, त्याग करा, द्या, एकट्यानें खाऊं नका' असं त्यागी ऋषि मानवाला बजावून सांगत असतो. बाळा, त्यागाचं तत्त्व आचरणांत आणल्यानेंच मानवांत आदर, संतोष, मैत्रभाव, इत्यादी सद्भावनांचा प्रसार होऊन सर्वांना शांति लाभेल व मानवजातीचा उत्कर्ष होईल.

''पण त्याग न करतां मानव जर भोगप्रधान वृत्तीचा बनून विषयांच्या आधीन होईल तर त्यामुळें लोभ, काम, क्रोध, अहंकार, द्वेष, मत्सर वगैरे दुर्विकार बळावत जाऊन त्यांपायीं मानवामानवांत संघर्ष निर्माण होईल आणि त्याचं पर्यवसान कलह-झगड्यांत होऊन अखेर मानवजातीची अवनति होईल.

''बाळा, तेव्हां यज्ञाचा जीवनाशीं खरोखरी कसा संबंध आहे हें आतां ध्यानांत आलं ना?''

वामनानें मानेनेंच आपली अनुमति दर्शविली. तें पाहून काश्यप पुढें म्हणाला, ''बाळा, वसाहतकर्त्या लोकांमध्ये सत्प्रवृत्तींचा प्रसार व्हावा एतदर्थ त्यांना वेदांची शिकवण सातत्यानें देण्यासाठीं म्हणूनच अस्तीनें आपला आश्रम स्थापला.''

अगस्तीबद्दलच्या नितान्त आदराची भावना आतां वामनाच्या मुखावर दिसूं लागली. तो उल्हसित वृत्तीनें पित्याला म्हणाला, ''तात, अगस्तीचा केवढा हा थोरपणा! मला वाटलं होतं कीं वसाहती स्थापल्यावर अगस्ति त्यांचा राजा बनेल.''

वामनाचे शब्द ऐकून काश्यपाच्या भावना एकदम उचंबळून आल्या व त्या भरांत तो म्हणाला, ''नाहीं, तो राजा बनला नाहीं. बाळा, अगस्तीला राज्यपद नको होतं; लोकांचा उत्कर्ष हवा होता; यासाठीं त्यांना सत्प्रवृत्त बनवायचं होतं.

''पुत्रा, सत्प्रवृत्तींची जोपासना वा वाढ ऋषींच्या आश्रमांतून होत असते, राजांच्या दरबारांतून नव्हे.''

पित्याचे हे शब्द वामनाच्या हृदयाशीं अगदीं

खोल खोल जाऊन भिडले. त्यामुळें अननुभूत अशा एका संवेदनेचा त्याला अनुभव आला.

क्षणभर पितापुत्र एकमेकांच्या नेत्रांकडे पाहात स्तब्ध राहिले.

मग हळू हळू काश्यप पुन्हा बोलूं लागला,

''बाळा, इथल्या अरण्यांतून नरभक्षक माणसं वावरत होतीं हें तुला ठाऊकच आहे. वसाहतकर्त्यांना त्यांच्याकडून भयंकर उपद्रव होत होता. तो बंद होणं अत्यंत निकडीचं होतं. बाळा, अगस्तीनें त्यासाठीं काय करावं असं तुला वाटतं?''

असें म्हणून काश्यपानें वामनाकडे उत्तरार्थी नजरेनें पाहिलें.

वामन पित्याचें भाषण अगदीं एकाग्र चित्तनें ऐकत होता. त्याला स्वतःचें असें वेगळें भानच उरलें नव्हतें.

पुत्राची ही अवस्था ओळखून काश्यप पुढची हकीकत सांगूं लागला,

''बाळा, सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत परमेश्वराचं वास्तव्य आहे. ही वेदांची शिकवण अगस्तिऋषीच्या रोमरोमांत भिनलेली होती. म्हणून त्या रानटी माणसांबद्दलही आत्मीयतेची भावना त्याच्या अंतःकरणांत निर्माण झाली.

''त्या आत्मीयतेच्या भावनेनें अगस्ति त्या नरभक्षकांच्या जवळ, अगदीं जवळ गेला; त्यांच्यांत मिसळला आणि त्यांच्याशीं समरस झाला.

''कोणत्याही प्रकारच्या सुखाची त्याला अभिलाषा नव्हती, त्याचं मन निर्मळ होतं.

''बाळा, मन निर्मळ तिथें भय कसलं?''

''अगस्तीनें मग त्या वन्य माणसांना शेती शिकवून तिरकमठा टाकायला लावलं, त्यांना शांतिमय जीवनाचा मार्ग दाखवून आपणासारखं केलं आणि अखेर आपल्या अनुयायांत सामावून घेतलं.''

हा सारा इतिहास ऐकून वामनाची मुद्रा आतां प्रसन्न झाली होती. तें पाहून काश्यप पुढें म्हणाला, ''बाळा, ज्या ह्या दक्षिणापथांत एके काळीं घोर अरण्यं आणि त्यांत हिंस्र पशू व नरभक्षक माणसं वावरत होतीं त्याच जागीं नंतर जीं असंख्य गांवं वसून त्यांत एकमेकांशी सलोख्यानें राहणाऱ्या मानवांचा एकजिनसी समाज नांदूं लागला. त्याचं सारं श्रेय त्या महान अगस्तीला आणि त्याच्या अंगी भिनलेल्या 'त्याग करा, त्याग करा' ह्या वेदांच्या शिकवणीलाच आहे.''

हे ऐकून वामन चटकन् म्हणाला, '' होय तात, म्हणजे ह्या दक्षिणापथाला समृद्ध बनवलं तें एका त्यागी ऋषीनें, कोणी भोगप्रधान राजानें नव्हे.''

आपल्या भाषणाला अपेक्षित परिणाम पुत्रावर झाला आहे असें पाहून काश्यपाला पराकाष्ठेचें समाधान वाटलें.

अगस्तीच्या हकिकतीची इति करीत तो म्हणाला, ''पण बाळा, ध्यानांत असूं दे कीं अगस्तीच्या हातून हें जें महान् कार्य घडून आलं त्याच्या मुळाशीं त्याच्या ठायीं बाणलेली वेदांची

शिकवण होती आणि जीवनांत स्वतः पराकोटीचा त्याग त्यानें केलेला असल्यामुळें ती शिकवण इतरांच्या गळीं उतरवण्याचं सामर्थ्यही त्याला आलेलं होतं.''

असें म्हणून काश्यपानें पुत्राकडे पाहिलें तों काय? त्याचे नेत्र अर्धोन्मीलित झालेले असून हात वंदनार्थ जोडलेले होते.

काश्यपाला आपल्या जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटलें.

### 'ऋषीचं तेज दाखवूं का?'

वामन खरा जिज्ञासु होता. ऋचांचे नुसते पाठ घेऊन त्याची तृप्ति होत नसे. त्यांसंबंधीं तो पित्याला प्रश्नांवर प्रश्न विचारी. काश्यप शांतपणें उत्तरें देऊन त्याचें समाधान करी.

वामनाची ग्रहाणशक्ति तीव्र असल्याकारणानें त्याला वेदांचा अर्थ उत्तम प्रकारें कळूं लागला आणि त्यांतील बराच भाग लाक्षणिक आहे ह्याची त्याला जाणीव झाली.

एकदा पर्णकुटीच्या बाहेरील पारावर बसून वामन पाठाची उजळणी करीत होता. अंगिरस कुत्स ऋषीचें एक सूक्त चालू होतें. काश्यप ऐकत होता.

ते म्हणून झाल्यावर काश्यपानें पुत्राला प्रश्न केला, ''पुत्रा, अरुणो मा सकृत वृकः पथायन्त दूदर्शीहि उज्जिहिते निचाय्या तष्टेव पृष्ठयामयी।' ही ऋचा तूं आतां म्हटलीस. बाळा, 'मी सरळ मार्गानें जात असतां, अरुण वर्षाच्या लांडग्यानें, पोंक काढलेल्या सुताराप्रमाणें माझ्यावर अचानक झांप घातली,' असं ह्या ऋचेंत ऋषी म्हणतो. तर ह्याचा अर्थ काय रे?''

किंचित् विचार करून वामनानें उत्तर दिलें, ''तात, दुर्बुद्धीवर हे लांडग्याचं रूपक आहे. एखादा लांडगा जसा संधिप्रकाशांत दबा धरुन बसतो आणि वाटेनें जाणाऱ्या माणसावर झडप घालतो, त्याप्रमाणें दुर्बुद्धि सरळ रस्त्यानें जाणाऱ्या मानवावर अचानकपणें झेंप घेऊन त्याला वाकड्या मार्गानें नेत असते, असा ऋषीच्या म्हणण्याचा आशय दिसतो.''

वामनाचें उत्तर ऐकून काश्यपाचें समाधान झालें.

ह्यावेळीं पृश्नी अंगणांत जवळच भगवंताच्या पूजेसाठीं फुलें वेंचीत होती. तिचे कान पितापुत्रांच्या संभाषणाकडे होते. वामनानें दिलेलें लांडग्यासंबंधींचें उत्तर ऐकून तिला तर हात स्वर्गाला पोंचल्यासारखें झालें.

अशा प्रकारें वामनाचें अध्ययन अत्यंत समाधानकारकपणें चाललें होतें. त्याची वेदशास्त्रांत झपाट्यानें प्रगति होत होती.

काश्यपासारखा पिताच गुरु असल्यावर मग आणखी काय हवें?

वामन ब्रह्मचर्यव्रताचें पालन कांटेकोरपणें करी. आपला संयमाचा दंड नेहमीं जवळ बाळगी.

हातांत भिक्षापात्र घेऊन वामन माध्यान्हीपूर्वी रोज आसपासच्या आश्रमांतून भिक्षेसाठीं जाई.

सारे आश्रम बहुतेक ओसच पडलेले होते. एखादा वृद्ध ऋषि आणि चार दोन ऋषिस्त्रिया

तेथें दिसत. ऋषींचीं मुलें नातवंडें नगरांत आतां स्थायी झालेलीं असल्यानें त्या साऱ्या भागांत भिक्षाटन करणारा हा एकच बटु होता.

त्यामुळें वामन आला कीं ऋषिस्त्रियांना आनंद होई. त्याची प्रफुल्लित मुद्रा पाहून त्यांना प्रसन्न वाटे. वेदपठणानें कसलेल्या आवाजांत त्यानें 'ॐ भवति भिक्षान्देहि । असें म्हटलेलें ऐकून त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहात.

मग त्यांनी मोठ्या कौतुकानें त्याला मधुकरी घालावी ह्यांत नवल नाहीं.

वामन मधुकरी घेऊन परत फिरल्यावरही त्या त्याच्याकडे पहात उभ्या रहात!

अशाच एक प्रसंगीं लोपामुद्रा नांवाच्या एका ऋषिस्त्रीच्या पर्णकुटींत वामन मधुकरीसाठीं गेला असतांनाची हकीकत आपण प्रारंभीं वाचली आहेच.

काश्यपाच्या आश्रमापासून थोड्याच अंतरावरील एका आश्रमांतील वृद्ध ऋषीचा पुत्र फार काळापासून बलिराजाच्या राजधानींत स्थायी झाला होता. आपल्याच वयाच्या दुसऱ्या दोन मित्रांना घेऊन तो आतां चार दिवस विश्रांतीसाठी म्हणून तेथे आला होता. बरोबर त्यांनीं आपल्या तरुण स्त्रियाही आणल्या होत्या.

वामन सायंकाळीं नदीवर संध्यावंदन करण्यासाठीं नियमानें जाई. त्या वेळीं हे नगरवासी पाहुणे बहुधा नदीवरच फिरत असायचे.

रोज ती मंडळी नवे नवे चित्रविचित्र पोशाख चढवीत. इतरांची टिंगल टवाळी करीत. त्यांच्या बोलण्यात कधी कोणाबद्दल आदर वा मैत्रभाव नसे. त्यांनीं संध्यावंदन केलेलें तर वामनाला कधींच दिसलें नाहीं.

त्यांचें एकंदर वर्तन पाहून वामनाला घृणा आली. त्याचें मन उद्विग्न झालें.

वामन सरळमार्गी होता. ती मंडळी नदीवर अमूक एक ठिकाणीं आहेत असें दिसलें कीं वामन दुसऱ्याच बाजूला फिरे. त्यांना शक्य तों तो टाळीत असे.

ती मंडळी असेपर्यंत वामन त्यांच्या आश्रमांत मधुकरीसाठी कधींच गेला नाहीं.

चार दोन दिवसांपासून वामनाच्या वृत्तींत फरक झाला आहे हें काश्यप व पृश्नी ह्या दोघांच्याही ध्यानांत आलें.

''बाळ सरळमार्गी आणि मोकळ्या मनाचा! मग तो असा उद्विग्न कां?'' पृश्नीला कांहीं सुचेना.

सर्व आन्हिक वगैरे आटोपल्यावर दोन प्रहरीं काश्यप थोडा वेळ विश्रांति घेई. त्या वेळीं वामन तपोवनांत फिरुन आपल्या लाडक्या हरिणांशी खेळत असे.

आज त्या वेळीं पृश्नीनें त्याला आपल्या जवळ बोलाविलें आणि त्याच्या पाठीवर ममतेनें हात फिरवित ती त्याला म्हणाली, ''बाळ, हल्लीं तूं असा खिन्न कां दिसतोस? तुला कुठें कांहीं झालं तर नाहीं ना?''

मातेच्या कंबरेला दोन्ही हातांनी विळखा घालून, तिच्या तोंडाकडे पाहात वामन म्हणाला, ''माते, ती शेजारच्या आश्रमांत आलेली मंडळी बघ कशी वागतात. रोज हवे तसले पोशाख काय

चढवतात, वेळीं अवेळीं खातात पितात काय, बोलतात काय, गातात काय, स्त्री काय, पुरुष काय, कांहींच ताळबंद नाहीं. माते, कोण आहेत ग हे लोक?''

वामनाचें भाषण ऐकून पृश्नीच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. वामनाच्या उद्विग्नतेचा तिला उलगडा झाला.

तेव्हां त्याला गोंजारीत ती शांतपणे म्हणाली, ''बाळा ती लोक नाहींत. तीं आपलींच माणसं आहेत. शेजारच्या भार्गव ऋषीचा पुत्र व सून आणि त्यांचे मित्र अशी ती मंडळी आहेत.''

वामनानें लगेच पुढें विचारलें, ''पण मग ह्या ऋषीपुत्रांना रोज नवे नवे चित्रविचित्र पोशाख ग कशाला हवे असतात?''

पृश्नीनें उत्तर दिलें, ''बाळा, पोशाखांचंच काय, पण साऱ्या चैनीच्या वस्तूंचं तसंच आहे. एक वस्तु मिळाली कीं लगेच दुसरी हवीशी वाटूं लागते. धृत मिळालं कीं अग्नि भडकत जातो. तद्वतच, बाळा, विषय मिळाले कीं वासना वाढत जातात. तृप्ति म्हणून कधीं होत नसते.''

वामन शांतपणें ऐकत होता. तो आतां म्हणाला, ''होय माते, वासना अतृप्त राहूं लागल्या कीं मग विषयासक्त झालेल्या माणसांत मोह, मत्सर, लोभ, द्वेष, क्रोध, दंभ, अहंकार इत्यादि दुर्विकार बळावत जाऊन त्यामुळें मानवामानवांत संघर्ष निर्माण होतो आणि परिणामीं कलह-झगडे माजून, विषयासक्तीपायीं मानव अखेर स्वतःचा नाश करून घेतो.''

पुत्राच्या विचारांची झोप पाहून पृश्नीला गुदगुदल्या झाल्या. त्याला आपली अनुमति दर्शवीत ती म्हणाली, ''होय बाळा, म्हणूनच वासना काबूंत ठेवा असं वेदशास्त्रांचं निक्षून सांगणं आहे.''

मूळ पदावर येऊन वामनानें आतां प्रश्न केला, ''माते, ही मंडळी नेहमीं कुठें असतात?''

पृश्नीनें उत्तर दिलें, '' बाळा, तीं बलिराजाच्या राजधानींत स्थायी झालीं आहेत.''

लगेच वामनाचा प्रश्न आला, ''तिथें काय करतात?''

बाळाचा हा प्रश्न किती साधा? पण तो कानीं पडतांच पृश्नीच्या हृदयाला चरका बसला.

बलिराजाच्या राजधानींतील चैनीच्या वस्तूंचें उत्पादन करणारीं प्रचंड कार्यालयें आतां तिच्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं आणि त्या कार्यालयांतून वासनांना उत्तेजित करणाऱ्या नव्यानव्या चिजा बनविण्यांत मग्न असलेलीं आपल्यासारख्याच ऋषिकुळांतून जन्माला आलेलीं अनेक कार्यक्षण माणसें तिला दिसूं लागलीं.

'हाय, ह्यांची सारी बुद्धि, कल्पकता आणि काळ लोकांना चैनीचे विषय उपलब्ध करून देण्यांतच खर्च होत असावा ना?' असा विचार मनात घेऊन पृश्नी अत्यंत खिन्न झाली.

पण बाळाला आपली खिन्नता दिसूं न देतां ती म्हणाली, ''बाळ, बलिराजानें आपल्या राजधानींत सिद्धींच्या बाळावर सुखसाधनांचं उत्पादन करण्यासाठीं जीं मोठमोठीं कार्यालयं काढलीं आहेत त्यांना नित्य नव्या नव्या कल्पना

पुरवण्याचं कार्य भार्गवपुत्राकडे आहे. बलिराजाची त्याच्यावर फार मर्जी आहे.''

हें ऐकून वामन किंचित् त्वेषाने म्हणाला, ''हं; आलं ध्यानांत. म्हणजे प्रजेच्या वासना भडकावणारा हा बलिराजाचा हस्तक आहे असंच म्हणा ना.

''पण माते, वासनांचं उद्दीपण करणारे नवे नवे विषय प्रजेपुढें नित्यशः ठेवून तिला विषयासक्त बनवल्यानें त्याचा परिणाम अखेर काय होईल ह्याची त्या बलिराजाला शुद्ध आहे का?''

महाप्रयासानें इतका वेळ दाबून टाकलेला पृथ्वीचा त्वेष आतां बाहेर पडला आणि त्या भरांतच ती म्हणाली, ''बाळा, तशी शुद्ध जर बलिराजाला असती तर आज ऋषींचे आश्रम ओस पडले नसते. वेदांच्या शिकवणीची पायमल्ली झाली नसती.''

मातेचे हे शब्द कानीं पडतांच, वेदांच्या शिकवणीमुळेंच अगस्ति ऋषीनें विंध्य ओलांडण्याचें साहस करून येथें वसाहती स्थापन केल्या, त्यांना स्थैर्य आणण्यासाठीं जिवाचें रान केलें, प्राणांचीही पर्वा केली नाहीं, तो सारा इतिहास वामनाच्या डोळ्यांपुढें उभा राहिला आणि एका ऋषीच्या अविरत श्रमांमुळे निर्माण झालेल्या ह्या समृद्ध देशाला बलिराजा आपल्या भोगवृत्तीपायीं विनाशाच्या मार्गानें नेत आहे ह्याची जाणीव होऊन वामनाला बलिराजाचा संताप आला आणि त्याच्या आवेशांत तो पृथ्वीला म्हणाला, ''पण माते, ती वेदांची शिकवण अंगी बाणलेली असल्यामुळेंच एका त्यागी ऋषीच्या हातून हा आज समृद्ध असलेला दक्षिणापथ देश बसविला गेला हें त्या भोगलंपट बलिराजाला ठाऊक नाहीं का?''

पृथ्वीनें संतापानेंच उत्तर दिलें, ''आयतोबांना तसल्या गोष्टी कशाला ठाऊक असतील? बाळा, त्या देहपूजकाला स्वतःपुढें दुसरं कांहींच ठाऊक नाहीं. दानशूर अशी आपली कीर्ति दिगंतांत पसरलेली असून आपण ह्या दक्षिणापथ देशाचे स्वामी आहोंत आणि लौकरच अवघ्या जंबुद्वीपाचेही सार्वभौम होऊं अशा घमेंडींत तो आहे. एका यःकश्चित ऋषीची आणि वेदांच्या शिकवणीची त्यानें कशाला पर्वा करावी?''

मातेच्या ह्या भाषणानें वामनाचा संताप अनिवार झाला, मुद्रा लाल झाली, ओठ स्फुरूं लागले, शरीराला कंप सुटला आणि त्वेषाच्या भरांतच तो अधीरतेनें म्हणाला, ''तर मग माते, वेदांची शिकवण अंगीं बाणलेल्या ऋषीचं तेज कसं असतं तें मी त्याला एकदा दाखवूं का?''

हें म्हणत असतां वामनाच्या नेत्रांतून अलौकिक असें एक तेज बाहेर पडलें.

तें पाहून पृथ्वी आश्चर्यानें थक्क झाली.

पण त्याच वेळीं, तपोवनांत वामनाची वाट पाहून कंटाळलेलीं त्याच्या रोजच्या संवयीचीं हरिणें त्याला शोधीत शोधीत तेथें आलीं आणि त्याच्या भोंवतीं गोळा झालीं.

वामन त्यांना गोंजारूं लागला.

तें पाहून पृथ्वीच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले.

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

भारतवर्षात अनेक देव देवतांच्या उपासना आहेत. अनेक धर्मांची वेगवेगळी दैवते आहेत. हिंदू धर्मही त्याला अपवाद नाही. या धर्मात विविध संप्रदाय असून प्रत्येक संप्रदायाची दैवते, मंदिरे व उपासनेचे प्रकार ठरलेले आहेत. सर्व धर्मांमध्ये उपासना आहेच. माणसाने जेव्हा त्याच्या बुद्धी, बल, प्रयत्न यांनी एखादे कार्य सिद्ध होत नाही तेव्हा आपल्या यासर्व गुणांच्या, बुद्धीच्या, ज्ञानाच्यापेक्षाही मोठी शक्ती आहे, तिला ईश्वर, ईश्वररूप वा ईशशक्ती समजून त्यांची उपासना सुरु केली. ही उपासना सर्व सामान्यतः दोन प्रकारात असते. १) सकाम २)निष्काम- सकाम उपासना ही विशिष्ट कार्य साध्य करण्यासाठी (आधिदैविक, आधिभौतिक) या संकटांवर मात तर निष्काम उपसना ही आध्यात्मिक उन्नतीसाठी असते. उपासना कोणत्याही दैवताची असो, हिंदूधर्मात प्रथम श्रीगणेशाचे पूजन करूनच केली जाते. याचा अर्थ एकच आहे की श्रीगणेश हे दैवत अग्रपूजेचेच आहे, म्हणून प्रथम श्रीगणेश हे दैवत सर्वश्रेष्ठ आहे हे लक्षात येईल. हे त्या श्रीगणेशाचे सर्वश्रेष्ठत्व कसे आहे त्यासंबंधी हा लेख लिहिला आहे.

''गणाधिश जो ईश सर्वा गुणांचा॥ मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा॥'' हे समर्थ रामदासांचे काव्य वा ''ॐ नमोजी आद्या॥ वेदप्रतिपाद्या॥ जयजय स्वयंवेद्या॥ आत्मरुपा॥'' हे श्री ज्ञानेश्वर माऊलीचे गणेशवंदनेतील चरण/ओवी हेच दाखविले की श्रीगणेश हे दैवतच अनादि अनंत आहे.

मूळात गणपतीचे रुप, आकार, गुण कसे होते याचा शोध घेतला तर असे लक्षात येते की आजचे गणपतीचे जे रूप आहे, त्याला जे विविध गुणाविष्कारांनी मंडित केले आहे ते सर्व मानवाला जसजशी बौद्धिक प्रगती लाभली व त्याला पुढे जसजसे अनुभव येत गेले त्यातून निर्माण झाले आहे.

श्रीगणेश देवता ही निर्गुण निराकार होती. निर्गुणाचा मूळारंभ होती. सगुण साकार हे नंतरचे आविष्करण झाले. वेदांमध्ये सर्वात प्राचीन वेद ऋग्वेद आहे. त्यात निसर्गशक्तीच्या प्रार्थना पुढे औपनिषदिक (उपनिषदिक) ज्ञानचर्चा या चर्चेतून विश्वरहस्य उकलले. नंतर योगशास्त्रातून प्रत्यक्ष अनुभूती व साक्षात्कार अशा क्रमाने निर्गुण निराकार सत्याचे परिपूर्ण ज्ञान जनसामान्यापर्यंत जावे, त्याचा त्यांना लाभ व्हावा म्हणून ज्ञानी योगी ऋषीमुनींनी प्रतिकांची निर्मिती केली. रुपककथा, कहाण्या रचल्या, पुराणे लिहिली व त्यातून दैवत प्रतिके, त्यांची पूजा, फलश्रुती सांगून प्रचार केला. हाच शुद्ध भारतीय दैवत कल्पनेचा ऐतिहासिक क्रम होय.


सर्व श्रुती, स्मृती, पुराणे अभ्यासली तरी असे दिसूनयेते की ब्रह्मा, विष्णू, महेश, देवी इ. इ. इनेक देवदेतांनी त्यांच्यावरील कठीण समस्या प्रसंगी श्रीगणेशपूजन करून त्यांची स्तुती करून कार्ये सिद्धीस नेली आहेत. पण श्रीगणेशांनी कोणाचे स्तवन उपासना केल्याचे उदाहरण नाही महणजेच ते दैवत सर्वश्रेष्ठ आहे हे मानावे लागेल. शिवभक्त श्रीशंकरास, वैष्णव श्रीविष्णूस, दैवी भक्त देवीस, प्रतिक मानतात तर गणेशभक्त गणेशास ॐकार प्रतिक मानतात म्हणजेच ॐकार व श्रीगणेश यांचा अन्योन्य संबंध आहे. आद्य उपाधी म्हणजे ॐकार. श्रीज्ञानेश्वर

माऊलींनीही गणेश वंदनेत श्रीगणेशाचे उपनिषद प्रतिपादित शुद्ध एकरस,जगत्कारण, स्वसंवेद्य, प्राणस्वरूप असेच रुप प्रथम सांगितले आहे. कोणत्याही देवस्वरुप वर्णनाचे दोन भाग असतात - वाच्य व लक्ष. यातील वाच्य हा भाग मर्यादित असतो व लक्ष्य हा भाग व्यापक, अमर्यादित व त्रिकालबाधित असतो. उपनिषदांतून प्रथम लक्ष्य या निर्गुण निराकार श्रीगणेशाचे वर्णन केले आहे.

ॐ नमस्ते गणपतये, त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि। त्वं सत्विदानंदोऽद्वितोतीयोसि। त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि। त्वं साक्षादात्मासि नित्यम्।... इ.इ. (गणपती अथर्वशीर्ष), निर्गुण, निराकार, निर्विशेष परब्रह्म स्वरुपाचे प्रतिक ॐकार, प्रणव असे श्रुती सांगते. ज्ञानेश्वरीत अध्याय १७ ओवी ४०२ सांगते की ''ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म ते नव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट। तयाचे हे आंतुवट । व्यंजक नाम ॥'' मांडुक्य उपनिषद, प्रश्नोपनिषद, मांडुक्यकारिका, गीता अध्याय १७ यातून ॐ कार महात्म्य अनेक विधप्रकारे वर्णन केले आहे. श्रीगणपति अथर्वशीर्षात त्वं आत्मासि व त्याच अनुरोधाने श्री ज्ञानेश्वरांची ''ॐ नमोजी आद्या ।... आत्मरुपा ॥१॥ अशी ओवी लिहून प्रथम प्रणव निर्देश करून आद्या, आत्मरुपा, स्वसंवेद्या या विशेषणांनी त्यासवे मंडित केले आहे व त्याद्वारे ॐकार प्रथम आहे हे सांगितले जे उपनिषदांसी संयुक्तिकच ठरते.

पुढे त्यांनी ''देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु।'' असे वर्णन केले आहे. देव हा स्वयंप्रकाशीच असतो व तोच सर्वांच्या बुद्धीला प्रकाश देतो. गणेश ही बुद्धीची अधिष्ठात्री देवता आहे. हे वर्णन श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या देवविषयक व्यापक विशाल भावनेचे प्रतिक आहे. मर्यादा असलेली वस्तु ''देव'' या संज्ञेस प्राप्त नसते. या श्रीज्ञानेश्वर माऊली लिखित गणेशवंदनेत श्रीगणेशाचे लक्ष्य स्वरुपवर्णन व नमन करून नंतर त्याच्या वाच्य स्वरुपाचे वर्णन आहे. श्रीगणेश अथर्वशीर्षातही प्रथम ''त्वं सच्चिदानंदाऽद्वितीयोऽसि'' अशा वर्णनानंतरच साकार रुप वर्णन ''एकदन्त चतुर्हस्तं पाशंअंकुशधारणम्'' असे आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज यांनीही गणेशाचे मूर्तीरुप ''अकार चरणयुगुल । उ कार उदर विशाल। स कार महामंडळ मस्तकाकारे ॥ असे श्री गणेशवंदनेच्या १९ व्या ओवीत केले आहेत. ते शब्दब्रह्म वाङ्मय म्हणजे प्रणवोत्पन्न असे गणेश मूर्त रुप. अर्थात ॐ या शब्दाचे ''अ'', ''उ'' व ''म'' हे तीन स्वर असल्याने त्यांनी त्यातून हे मूर्तीरुप वर्णन केले आहे.

ॐ कार हे गणेशाचे निर्गुण निर्विशेष स्वरुप प्रतिक आहे. ते मूळातच ध्वनीरुप होते व पुढे लेखन शास्त्र विकास पावल्यावर वर्णमाला निर्माण होऊन त्याचे अक्षररुप साकार झाले. आपण ॐकाराच्या लेखन पद्धतीत जर बघितले तर प्रत्येक भाषेत त्याचे अक्षररुप वेगवेगळे साकारलेले दिसेल, तरी पण उच्चार मात्र अ, उ, म याच तीन अक्षरांचा एकत्रित केलेला ध्वनी सर्वत्र सारखाच आहे. सगुण साकार व निर्गुण निराकारात हाच फरक आहे. निर्गुण निराकार हे सदा त्रिकालाबाधित सत्य असते ते याचमुळे. या ॐकाराचे काही अक्षरप्रकार वेगवेगळ्या लिपीतले येथे देणे योग्य ठरेल ते याचसाठी की गणेशाचे ॐ हे ध्वनीरुप निर्गुण निराकार आहे. मग सगुण साकार कसे कां असेना म्हणजेच अविनाशी ब्रह्म ॐ म्हणजेच गणेश हे लक्षात येईल.




या वेगवेगळ्या भाषांतील ॐ काराचे लेखन आकार / स्वरुपात भिन्नत्व दाखविते तरी ध्वनी ''ओम'' हाच आहे, त्यामुळे साकाररुपात भिन्नता असली तरी ध्वनी एकच म्हणजे ॐच होतो हे लक्षात घेणे.

ऋग्वेदात ब्रह्मणस्पतीदेवतेचा जो उल्लेख आहे, तो ब्रह्मणस्पती हाच जगाचे आदिकरण मूळ निर्गुण व ब्रह्म गणपति हे प्रतिकात्मक सगुण ब्रह्म तेव्हा निर्गुण निराकार, सगुण साकार हे दोन्ही एकच आहेत. जो फरक दिसतो तो व्यावहारिक वा काल्पनिक तेव्हा ''ब्रह्मणस्पती सूक्त'' जे वैदिक मंत्राचे आहे व ऋग्वेदात आहे तेच गणपतीचे अतिप्रिय असणारच कारण तेच प्रथम आविष्करण आहे, गणपतीच्या स्तुतीचे म्हणजे गणेश महिमाचे म्हणजे वेदकाळातही गणेश उपासना होती तर गणेश दैवत त्याही आधीचे असणारच. किती आधी हा प्रश्नच येत नाही कारण ध्वनीरुप ॐ हे गणेशाचे निर्गुण निराकार रुपच आद्य, त्यास आदि नाही अंतही नाही. हे गणेशाचे अधिष्ठान सर्व देवांच्याही आधीचे म्हणजे जेष्ठ होय तेव्हा जेष्ठराज या संज्ञेस प्राप्त श्रीगणेश हेच सर्वप्रथम पूजनीय कारण तेच मूळ स्रोत. श्रीगणपति अथर्वशीर्ष हे तर गाणपत्य संप्रदायाची अंतिम चरण सीमा व मानवतेची असीम मान्यरेखा होय. शीर्ष याचा अर्थ श्रेष्ठ. अथर्वण ऋषींनी शब्दरुप दिलेले व सर्व सूक्तांमध्ये श्रेष्ठतम ठरलेले म्हणजेच अथर्वशीर्ष.अथर्व यात थर्व हा जो धातू आहे त्याचा अर्थ मनाची गती हा होय. मनाच्या पलीकडे गेले तरच मनाची गती थांबेल. अ म्हणजे नाही म्हणजे ज्याची गती थांबली तो अथर्व, पण ही शरीराची गती नसून मनाची आहे व असंप्रज्ञात समाधिशिवाय मनापलीकडे जाता येत नाही. तेव्हा मनापलीकडे जाऊन मनाचे संपूर्ण उन्मनीकरण झाल्यानंतर विशुद्ध आत्मस्फुरणातून प्रकट झालेले हे सूक्त हे परमात्म्याएवढेच व्यापक, सर्वश्रेष्ठ व शाश्वत ठरते म्हणूनच हे सूक्त अजरामर झाले. हे अथर्वशीर्ष म्हणजे तत्त्वज्ञान व अध्यात्म असलेलेच नव्हे तर ते राष्ट्रीय, सांस्कृतिक व वैचारिक आहे. राष्ट्रीय एकात्मता / तत्वज्ञान / अध्यात्माची गंगा, उपासनेची यमुना व ज्ञानाची सरस्वती असा त्रिवेणी संगम आहे यात. गणपतीस या अथर्वशीर्षात ''त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि । त्वं साक्षात आत्मासि नित्यम् ।, त्वमेव केवलं तत्वमसि ।, त्वमेव केवलं खल्विदं ब्रह्मासि ।, त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः।, त्वमानंदमय त्वं ब्रह्ममया ।, त्वं सच्चिदानंदाद्वितीयोसि ।, त्वं ज्ञानमयोविज्ञान मयोऽसि.।, सर्वं जगदिदंतत्वोजायते।, इ.इ. जे वर्ण आले आहे ते गणेशाचे मूळ स्वरुप व तोच सर्वांचा उत्पत्तीकारक आहे हे दर्शविते.

(लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकात)

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

प्र. सि. मराठे

जुलै २०१५ च्या अंकातील ‘ॐ नमोजी आद्या’ या शिर्षकाच्या लेखाला जोडून असा हा पुढील लेख - यात वेदविद्येच्या दुसऱ्या महत्त्वाच्या सिद्धांतावर विवेचन आहे. - संपादक

‘सर्वांचे आदी असे जे ‘ब्रह्मतत्त्व’ ते त्यानेच निर्माण केलेल्या सृष्टीतील सर्व चराचरांना व्यापून राहिलेले असते. हाच वेदविद्येचा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत होय. हेच ‘सत्य’ भगवान श्रीकृष्ण भ.गी.अ.९ श्लोक ४ च्या पहिल्या चरणात परब्रह्माच्या वतीने (प्र. पु. एकवचनात) सांगतात.

‘मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना’।

**मराठीत अनुवाद**

‘व्यापिले सर्व हे विश्व भावें अव्यक्त मी असे’॥

येथे भगवान सांगतात की, विश्वातील केवळ सजीवांना नाही तर निर्जीव जड वस्तूंनासुद्धा मी व्यापून राहिलो आहे. परंतु वस्तुतः जड वस्तूंमध्ये कोणतेच चैतन्य किंवा ऊर्जा आपल्याला भासत नाही (म्हणजे आपल्या ज्ञानेंद्रियांना गोचर होत नाही). निर्जीव जड वस्तू व सजीवांचे जड देहही काही मूलभूत पदार्थांच्या (elements च्या) अणूपासूनच बनलेले असतात व प्रत्येक अणूमध्ये केंद्राभावती विजाणू (electrons) अत्यंत द्रुतगतीने फिरत असतात असे आधुनिक भौतिकशास्त्रही सांगते. विजाणूंची ही ऊर्जा ब्रह्मतत्त्वाने निर्माण केलेल्या प्रकृतीचाच एक अंग असून सुप्तावस्थेत प्रत्येक अणूमध्ये बंद असते म्हणून आपल्याला ती गोचर होऊ शकत नाही. सजीवांच्या जड शरीरांतील अणूमध्येही ही सूत्र ऊर्जा असतेच. पण सजीवांच्या शरीरामध्ये आपल्याला आणखीन एका तऱ्हेचे चैतन्य भासते की जे पचेंद्रियांना गोचर असते आणि ते चैतन्य म्हणजे ब्रह्मतत्त्वाचा म्हणजे प्रत्यक्ष पुरुषाचा अंश असते. सजीवांच्या बाबतीतला हा सिद्धांत ईशावास्योपनिषदाच्या पहिल्या ऋचेच्या पहिल्या चरणातच आला आहे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।

या विश्वात जे जे काही जगते आहे, त्यात चैतन्यरुपाने सर्व विश्वाचे आदी असे ईशतत्त्वंच अंशरुपाने वास करीत असते. हाच तो सिद्धान्त!

**सजीवांचे जड शरीर आणि निर्जीव वस्तू या (त्याच) मूलतत्त्वांच्या अणूपासून बनलेल्या असतात असे भौतिक शास्त्र सांगते; तर मग सजीव देहामध्ये असे कोणते तत्त्व अधिक असते की, ज्यामुळे त्या देहाला सजीवता प्राप्त होते. या प्रश्नाचे उत्तर भ.गीतेच्या ७ व्या अध्यायाच्या ४ थ्या व ५ व्या श्लोकांत भगवंतांनी दिले आहे.**

**भूमिरापो ऽ नलो वायुः रवं मनोबुद्धिरेवच।**
**अहङ्कार इतियं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥४॥**

**अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।**
**जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥५॥**

**मराठीत -**

**भू आप तेज आकाश वायू बुद्धी व मानसा -।**
**अहंकारासहित ही माझी प्रकृति अष्टधा ॥४॥**

**अपरा ही परी अन्य माझी प्रकृति जी परा।**

श्रेष्ठ जीवस्वरुपी ती, जाण जी धारि या जगा ॥५॥

भगवान सांगतात - ''सजीवांचे देह ज्यांच्यापासून बनले आहेत जी पंचमहाभूते (वैज्ञानिकांच्या भाषेत मूलद्रव्ये) व सजीवांचे मन, बुद्धी आणि अहंकार या आठ गोष्टी माझ्या अपरा (अष्टधा) प्रकृतीच्या घटक आहेत. पण या सर्व जड देहातील चैतन्य, प्राण किंवा सजीवता ही गोष्ट मात्र माझ्या परा (दिव्य) प्रकृतीची घटक आहे; ही माझी परा-प्रकृतीच सर्व सजीव सृष्टीचा आधार आहे'' हे परा प्रकृतीचे चैतन्य, प्राण किंवा सजीवता (जीवन्तपणा) हे परमात्म्याच्या अतिसूक्ष्म अंश अशा आत्मरुपाच्या वास्तव्यामुळेच (सजीवाच्या) देहात प्रतीत होत असते. हाच तो महान सिद्धान्त ईशावास्योनिषदाच्या पहिल्या ऋचेच्या पहिल्या चरणात सांगितला आहे.

हे आत्मतत्त्व सच्चितानंद परमात्म्याचाच अंश असून ते शुद्ध आनंदस्वरुपात मनुष्याच्या अंतरात 'निहितं-गुहायां', अगदी खोल गुहेत लपल्यासारखे वास्तव्य करीत असते.

ते स्वतः अगदी निष्क्रिय व केवळ साक्षीरुपाच्या भूमिकेतच वास्तव्य करीत असले, तरी मानवी देहात निरनिराळी कार्ये करण्यासाठी निरनिराळे मुखवटे घेऊन मानवी शरीर व्यापून असते. त्या विशुद्ध आत्मतत्त्वाचे निरनिराळे मुखवटे व त्यांचे कार्य :-

आपले जड शरीर हे मूलतत्त्वांच्या अणूंपासून बनलेले आहे. ही मूलतत्त्वे शरीराला अन्नापासून मिळतात म्हणून वेदविद्येत या जड शरीराला 'अन्नमय' शरीर अशी संज्ञा दिली आहे.

प्राणमय शरीर- परमात्म्याने विश्वकर्म्याची योजना करून त्याच्याकडून मानवी देहाचे अतिशय गुंतागुंतीचे (Complex) जे यंत्र बनवून घेतले, त्या मानवी देहात, शरीर जीवित ठेवण्यासाठी पचन संस्था रुधिराभिसरण संस्था, श्वसन-संस्था, मज्जासंस्था इ. इनेक इन्द्रियसंस्था कार्यरत असतात. विश्वकर्म्यांने या निरनिराळ्या इन्द्रिय संस्था तर तयार केल्या, पण नंतर परमात्म्याच्या लक्षात आले की या संस्थांचे कार्य चालविण्यासाठी व त्यांच्या कार्यात समन्वय साधून वेळोवेळी योग्य निर्णय घेईल अशा एका महा संचालकाचीही गरज आहे आणि म्हणून परमात्म्याने अंशरुपाने सर्व प्राणिमात्रांच्या देहात वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला असे कल्पनात्मक वर्णन ऐतरेय-उपनिषदात आले आहे. ते अंतस्थ विशुद्ध 'आत्मरुप' देहातील या विविध संस्थांची कार्ये चालविण्यासाठी प्राणांचा मुखवटा घेऊन, 'प्राण' अपान, व्यान, उदान व समान या रुपांत सर्व जड शरीर व्यापून राहते म्हणून या अंतस्थ आत्मरुपाच्या मुखवट्याला 'प्राणमय' शरीर अशी संज्ञा दिली आहे.

आपण आपल्या हातापायांची हालचाल व ज्ञानेन्द्रियांचा उपयोग आपल्या इच्छेनुसार करु शकतो परंतु आपल्या देहात पचनादि संस्थांचे कार्य अविरत चालू असते. त्यांच्यावर आपले नियंत्रण नसते. जठरात अन्नाचा घास पोहचल्यावर जाठररस स्रवण्यास सुरुवात होणे, अन्नपचनाची क्रिया सुरु झाल्यावर विशिष्ट टप्प्यांवर स्वादुरस, पित्तरस जठरात (विशिष्ट प्रमाणात) सोडणे. आपण श्रमाचे काम सुरु केल्यावर जरुरीप्रमाणे श्वसनक्रियेचा वेग व हृदयाचे ठोके वाढणे वगैरे क्रिया आपल्या नकळत आपोआप होत असतात.

या शरीरान्तर्गत क्रिया वर उल्लेखिलेल्या प्राणरूपाचा मुखवटा घेऊन ते आत्मतत्त्वच अप्रत्यक्षपणे चालवत असते. आत्मतत्त्वाच्या या प्राणरुपाला (पचनक्रियेच्या संदर्भात) भगवद्‌गीतेत (अ.१५ श्लोक १४) 'वैश्वानर' या संज्ञेने संबोधिले आहे.

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणीनां देहमाश्रितः।
प्राणापानौ समायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्‌ ॥१४॥

वैश्वानराग्नि होऊन वसे मी भूतदेहिंच ।
प्राण अपाने पचवी मीच अन्न चतुर्विध ॥१४॥

वरील श्लोकात केवळ पचनकियेचा व 'प्राण' व 'अपान' या दोन प्राणरुपांचाच उल्लेख असला तरी शरीरांतर्गत सर्वच (अनैच्छिक) क्रिया, प्रक्रिया चालविणाऱ्या पंचप्राणरुप आत्मतत्त्वाच्या अवतारास 'वैश्वानर' म्हणूनच ओळखले जाते. हा वैश्वानरं पंचप्राणरुपात सर्व शरीर व्यापून राहिला आहे. म्हणून त्याला 'प्राणमय शरीर' ही म्हटले जाते. अन्नमय जड शरीरात हे 'प्राणमय' शरीर व्यापून आहे आणि त्या योगानेच जड-शरीराला सजीवता प्राप्त होते.

**मनोमय शरीर -**

इतर प्राण्यांच्या तुलनेत ईश्वराने माणसाला, मन, बुद्धी व अहंकार या तीन गोष्टी बऱ्याच विकसित स्वरुपात बहाल केल्या आहेत. इतर प्राण्यांची जीवनशैली ही प्रकृति नियमांच्या चाकोरीतच बांधलेली असते. परंतु माणसाला मात्र आपल्या मन-बुद्धीचा उपयोग करून आपल्या ईच्छेप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य ईश्वराने बहाल केले आहे. त्यामुळे कालमानाबरोबर मानवाच्या जीवनशैलीत विकास होत गेलाच, पण एकाच काळातसुद्धा प्रत्येक मनुष्याच्या स्वाभावात व आवडी-निवडीत आपल्याला खूपच भिन्नता दिसू शकते. या उलट अगदी पुराणकालातील व आताच्या मांजराच्या जीवन शैलीत आपणास विशेष फरक दिसणार नाही. माणसात मात्र मन, बुद्धी आणि अहंकार या तीन गोष्टीतल्या विविधतेनुसार व्यक्तिनिहाय विविधता दिसून येते. सर्व माणसांना अंतस्थ 'आत्मतत्त्व' जरी एकच असले तरी ते ते पूर्वजन्मातील कर्मानुसार, अभ्यासानुसार व अतृप्त वासनांनुसार मन व व बुद्धीच्या शिदोरीची पटले परिधान करूनच शरीरात प्रवेश करते. अशा पूर्वसंस्कारयुक्त विशिष्ट मनरुपात कार्य करणारे 'आत्मतत्त्व' मनोमयं रुपात शरीर व्यापून असते. प्राणमय शरीराच्या हृदस्थानी वसत असणाऱ्या व शरीराचा आकार घेऊन, शरीरास व्यापून राहणाऱ्या या आत्मतत्त्वाच्या रुपास 'मनोमय शरीर' म्हणतात. -

**प्रज्ञानंमय शरीर -**

मनापेक्षाही श्रेष्ठ अशा बुद्धीचे व्यापार चालवणाऱ्या आत्मतत्त्वाच्या अवताराला (मुखवट्याला) प्रज्ञानमय (बुद्धिमय) शरीर म्हणतात. हे प्रज्ञानमय शरीर मनोमय शरीराच्या केंद्रस्थानी वसत असून सर्व शरीर व्यापून असते.

**आनंदमय शरीर -**

या बुद्धीहूनही श्रेष्ठ असे जे आत्मतत्त्व जे केवळ आनंदमय आहे, ते आनंदमय-शरीर रुपाने प्रज्ञानमय शरीरांतर्गत स्थित असते. या आनंदमय शरीराच्या हृदस्थानी खुद्द आत्मतत्त्व (निहितं गुहायां' जणू गुहेमध्ये लपलेले असे )

अन्नमय, प्राणमय, मनोमय, प्रज्ञानमय व आनंदमय अशा पाच पांघरुणांनी वेष्टिलेले असे बंदिस्त असते आणि म्हणून त्या विशुद्ध आत्मरुपास भेटण्यासाठी आपल्याला खोल खोल अशी अंतरयात्राच करणे भाग आहे आणि या अंतरयात्रेत या पंचक्रोशींना (पाच वेष्टणांना भेदून) पार केल्याशिवाय 'निहितं गुहायां' अशा आत्मरुपाने दर्शन होणे अशक्य आहे. योगसाधनेने जो मानव या पंचक्रोशींना पार करतो त्यालाच आत्मदर्शन घडते व तोच मानव जीवनमुक्त जीवन जगतो व मृत्यूनंतर परमात्म्यांशी एकरुप होतो व जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून कायमचा मुक्त होतो असे तैत्तिरीयोपनिषदात सांगितले आहे.

असे हे 'आत्मतत्त्व' माणसाच्या शरीर मन व बुद्धीच्या क्रिया चालण्यासाठी ऊर्जा देत असले तरी त्या क्रिया करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य माणसालाच असते. त्या क्रियांकडे केवळ साक्षीभावाने नजर ठेऊन त्या सर्व कर्मांची नोंद ते ठेवत असते. या त्या भूमिकेची तुलना C.C.T.V. कॅमेराशी काही प्रमाणात करता येईल. C.C.T.V. कॅमेरा ज्याप्रमाणे त्याच्या दृष्टिक्षेपात येणाऱ्या सर्व गोष्टींची नोंद करत असतो; पण समोर घडणाऱ्या गोष्टींत त्याला काहीच देणे घेणे नसते. त्य्रप्रमाणेच हे 'आत्मतत्त्व' माणसाच्या सर्व कर्मांची नोंद केवळ साक्षीभावाने करत असते. परंतु कॅमेरा हा दृक्श्राव्य घटनांचीच नोंद करतो, तर हे 'आत्मतत्त्व' कर्माबरोबर, कर्म करणाऱ्या माणसाच्या मनातील हेतूचीही नोंद करत असते. कारण माणसाच्या कर्माचा गुणविशेष किंवा दर्जा (ते किती पापकारक पुण्यकारक आहे ते) हा ते करण्यामागे माणसाच्या हेतूप्रमाणेही ठरत असते. जसे मनुष्यवध हे कृत्य सामान्यतः मोठे पापकर्म समजले जाते, पण एखाद्या वीरपुरुषाने स्वदेश रक्षणासाठी झालेल्या युद्धात शत्रूचा केलेला वध, हे कृत्य मात्र अभिनंदनीय आणि पुण्यकर्म समजले जाते. (श्रीकृष्णाने नरकासुराच्या केलेल्या वधाच्या स्मृतिनिमित्त आपण आजही मोठा सण साजरा करतो.)

परमेश्वराने माणसाला शरीराबरोबर संवेदनशील मनाची व विश्लेषणात्मक बुद्धीचीही देणगी दिली आहे व त्यांचा उपयोग करून संसारात (आपल्या मनाप्रमाणे) बरे-वाईट कर्म करण्याचे स्वातंत्र्यही त्याला बहाल केले आहे. या स्वातंत्र्याचा उपयोग करून मनुष्य जी जी (स्वार्थी किंवा परार्थी) कर्मे करतो. त्यांची नोंद (त्या कर्मांच्या मागील हेतूसहित) त्याच्या अंतरातील 'आत्मतत्त्व' केवळ साक्षीभावाने निरंतर (२४ ह्र७) करत असते व ही सर्व माहिती (Data) परमात्म्याच्या मुख्य कार्यालयांतील 'चित्रगुप्त' नावाच्या Main Frame वर सतत पाठवीत असते.

रंकापासून रावापर्यंत, मूर्खापासून पंडितापर्यंत, पाप्यापासून पुण्यशीलापर्यंत सर्व तऱ्हेच्या माणसांमध्ये हे अंतरातील 'आत्मतत्त्व' ही साक्षीरुपाची भूमिका सारखीच बजावत असते. परंतु माणसाची परमार्थ मार्गावर जसजशी प्रगती होत जाते व त्या परिणामी त्या आत्मतत्त्वाशी जवळीक वाढत जाते त्याप्रमाणे हे 'आत्मतत्त्वं' आपली केवळ साक्षीभावाची भूमिका सोडून नवीन नवीन भूमिका घेऊ लागले व त्यांचा उपासकाला कसा अनुभव येऊ लागतो हे गीतेच्या १३ व्या अध्यायातल्या २२ व्या श्लोकांत अगदी थोडक्यात सांगितलेले आहे

तो श्लोक असा आहे -

उपद्रष्टानुमन्ताच भर्ता भोक्ता महेश्वरः।
परमात्म्येति चाप्युक्तो देहे ऽस्मिन् पुरुषः परः ॥२२॥

**मराठीत -**

सर्वसाक्षी अनूमन्ता भर्ता भोक्ता महेश्वर।
म्हणती परमात्मा त्यां देहीं जो या असे स्थित ॥२२॥

उपद्रष्टा म्हणजे केवळ साक्षीभावाने पाहत राहणारा. ('द्रष्टा' म्हणजे काहीतरी उद्देशाने पहाणारा, उपद्रष्टा म्हणजे केवळ अनिमित्त (Casual) पुढे आले म्हणून पहाणारा.)

वर वर्णन केलेली, आत्मतत्त्वाची ही उपद्रष्ट्याची प्राथमिक भूमिका ही सर्व मानवात (To start with by default) सारखीच असते. ईश्वरप्राप्तीसाठी केलेल्या (कोणत्याही योगमार्गाने उपासनेने माणसाची परमार्थ मार्गावर जसजशी प्रगती होत जाते, त्याप्रमाणे हे 'आत्मतत्त्व' आपली केवळ उपद्रष्ट्याची भूमिका सोडून पुढील भूमिका कशा घेते यांचा क्रमच या श्लोकात कसा सांगितला आहे ते पाहू -

कठोपनिषदात सांगितल्याप्रमाणे माणसापुढे 'श्रेय' व 'प्रेम' असे कर्म करण्याचे दोन मार्ग नेहमी खुले असतात. त्यांपैकी कोणताही एक मार्ग निवडून त्याप्रमाणे कर्मे करण्याचे स्वातंत्र्य मानवाला परमेश्वराने दिले आहे. इन्द्रियजन्य सुखभोगांकडे आकृष्ट होऊन (त्यांच्या मोहात पडून) ते कामोपभोग मिळविण्यासाठीच कर्मे करीत राहणे म्हणजेच 'प्रेय' मार्ग अनुसरणे होय. इन्द्रिये-विषय संयोगातून मिळणारी सुखे क्षणिक असून त्यापासून निर्माण होणाऱ्या उपाध्यांमुळे ती अंती दुःखान्तिकच ठरतात हे ओळखून (जाणून) सत्कर्मे करीत, आनन्दरुप परमात्म्याशी जवळीक साधण्यासाठी पारमार्थिक उपासना करीत रहाणे म्हणजेच 'श्रेय' मार्ग अनुसरणे होय. बहुतेक सामान्य माणसे कामोपभोगांच्या तत्काल सुखांच्या मोहात पडून 'प्रेय' मार्गाचाच अवलंब करतात. परंतु काही थोडी शहाणी धीरवान माणसे, खरे विशुद्ध शाश्वत सुख (आनंद) मिळविण्यासाठी परमार्थाचा म्हणजेच 'श्रेय' मार्गच पसंत करतात.

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥

असे भ. गीतेतही भगवन्त सांगतात -

अशा उपासनेत काहीशी प्रगती झाल्यावर उपासकाला आत्मतत्त्वाशी काहीशी जवळीक साधल्याचा प्रत्यय येतो. अशा उपासकाचे 'आत्मतत्त्व' केवळ उपद्रष्ट्याची भूमिका सोडून त्याच्यापुढील अनुमन्त्याची भुमिका धारण करते.

प्रपंचात वागताना उपासकाला (माणसाला) तत्काल कामोपभोगांचा मोह एका बाजूला तर ईशप्राप्तीची ओढ दुसऱ्या दिशेला ओढत असतात. अशावेळी प्रेयाचा मोह टाकून श्रेयाचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यासाठी हे आत्मतत्त्व उपासकाला आतून सूचना देऊ लागते व त्याला नेहमी सन्मार्गावर ठेवण्यासाठी, श्रेयमार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यासाठी अनुमन्ता होऊन मदत करु लागते. बऱ्याच सत्पुरुषांना आतला आवाज सांगतो आहे असा अनुभव येतो, तो याच प्रकारात मोडतो. महात्मा गांधीही आतल्या आवाजाचा उल्लेख बरेच वेळा

करीत असत. आतल्या आवाजाप्रमाणे मी हा निर्णय घेतला असे सांगत असत.

उपासकाची उपासना यशस्वीपणे आणखीन प्रगत झाली की तेच आत्मतत्त्व अनुमन्त्याच्या पुढील म्हणजे 'भर्त्याची भूमिका बजावू लागते. 'भर्ता' म्हणजे 'पालन कर्ता', 'पोषिता' संकटात मदत करून आधार देणारा असा अर्थ होतो. साधुसंतांच्या आयुष्याच्या संकटप्रसंगी परमेश्वर धावून येतो व संकट-निवारण करतो अशा गोष्टी आपण त्यांच्या चरित्रात व पुराणात वाचतो. आपल्या आप्तमित्रांकडूनही असे काही अनुभव आपण काहीवेळा ऐकतो. भ. गीतेच्या नवव्या अध्यायात प्रत्यक्ष भगवन्त सांगतात -

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥२२॥

**मराठीत**

भावे अनन्य ध्यानाने मला भक्त उपासती।
नित्ययोगीच जे त्यांचा मी योगक्षेम चालवी॥२२॥

**अर्थ -**

अनन्यभाव भक्तीने माझ्या उपासनेत मग्न राहिल्यामुळे माझ्या भक्तांचे संसार कार्यात काही दुर्लक्ष झाल्यामुळे काही अडचण वा संकट निर्माण झाल्यास मीच त्याच्यावरच्या संकटाचे निराकरण करतो. थोडक्यात त्याचा योगक्षेम ठीक चालविण्याची जबाबदारी मीच घेतो.

संत तुकारामांचा संसार (मुलबाळांसह) खूपच मोठा होता आणि त्यांचे अर्थार्जनाकडे मुळीच लक्ष नसे. तरी त्यांचा संसार (चैनीचा नाही पण) सामान्यपणे विठ्ठलकृपेनेच चालला होता. गोराकुंभाराच्या चुकीने कच्च्या मडक्यात असलेली मांजरीची पिले ते मडके त्याने भट्टीत घातल्यामुळे जळून गेली असणार. तेव्हा त्याच्या बायकोला मोठाच शोक झाला व हा अपघात गोरोबोच्या चुकीने झाला असल्यामुळे गोरोबाही मोठ्या अडचणीत येऊन पश्चात्ताप करू लागले. आपल्या हातून मोठेच पाप घडले म्हणून ते विठ्ठलाचा धावा करू लागले. विठ्ठलाने भर्त्याची भूमिका बजावली होती. दुसऱ्या दिवशी भट्टीतील मडकी काढताना मडके भाजले पण आतील पिले सुखरुप असल्याचा चमत्कार झाला असल्याचे गोरोबाच्या बायकोच्या दृष्टीस पडले. गोरोबा मोठ्याच पापदोषातून वाचले होते.

भक्ताची उपासना आणखी प्रगत झाली की अंतरातील परमात्मा (आत्मतत्त्व) भर्त्याच्या पुढची म्हणजे भोक्त्याची भूमिका घेतो. या भूमिकेत भगवान् भक्ताच्या सुखदुःखात स्वतःच सहभागी होऊ लागतात.

संतसखूला सासरी मारले गेलेले काठीचे वार किंवा तापलेल्या कालथ्याने दिलेल्या डागण्या प्रत्यक्ष भगवन्तच झेलत होता. त्यामुळे संत सखूच्या देहाला मात्र काहीच वळ किंवा डाग पडत नव्हते. एकदा तिच्या खाष्ट सासूने तिला अर्ध्या गोणभर धान्य दळण्यासाठी दिले. (जे काम एका बाईकडून २४ तासातसुद्धा पूर्ण होण्यासारखे नव्हते.) व दळण पुरे झाल्याशिवाय जेवण मिळणार नाही अशी धमकीही दिली होती. सखू बिचारी कृष्ण सख्याचे नाव घेऊन दळू लागली. तोच खुंट्यावर कृष्णाचा हात आला व ते दळण एका तासातच पुरे झाले व संत सखू

जेवणाच्या वेळी हजर झाली. भक्त प्रल्हादाच्या त्याच्या बापानेच केलेल्या छळाच्या बाबतीतही भगवन्ताने अशीच भोक्त्याची भूमिका घेतली होती असे भागवतात आजही आपण वाचतो.

संत एकनाथांना गिरिजेसारखी साध्वी पतिव्रता पत्नी लाभली होती. त्या उभयतांनी आदर्श गृहस्थाश्रम आचरुन आपल्या संसारात अत्यंत पवित्र दिव्य असे गृहसौख्य निर्माण केले होते; की ज्याच्यापुढे स्वर्ग-सौख्य ही तुच्छ वाटावे असे संसार-सौख्य चाखण्याचा (भोगण्याचा) मोह परमेश्वरालाही झाला आणि तो (भोक्त्याची भूमिका घेऊन) एकनाथांच्या घरी पाणक्या होऊन राहिला होता!

श्रीकृष्ण भगवान् आपल्या भक्ताला सांगतात -

लाभली गिरिजा पत्नी साध्वी संत पतिव्रता।
आणिला स्वर्ग संसारी उभयांनी गृहीच त्या॥

मलाही जाहला मोह चाखण्या गृहसौख्य ते।
सुख स्वर्गाहुनी श्रेष्ठ मद्‌भक्ताच्या गृहींच जे॥

झालो मी पाणक्या तयाचा देवी रोष जरी धरी।
रमलो करता सेवा डुंबलो सुख-सागरीं॥

करी असा जो संसार एकनाथाचि सारखा।
आहे मी जाण तेथेच भक्तागृहिंच राबता॥

*(**टीप** - दि. ३० मे २००३ या दिवशी सकाळच्या ध्यानात, लेखकाला कृष्णाने सूचवलेली एकनाथ प्रशस्तीमधील हे चार श्लोक आहेत.)

प्रल्हाद, संत सखू आदि भक्तांवर होणारे अत्याचार भगवान स्वतःवर घेऊन (झेलून) भक्तांचे रक्षण करीत होता. तर एकनाथांसारख्या आदर्श गृहस्थांनी त्यांच्या संसारात निर्माण केलेले दिव्य-गृह-सौख्य चाखण्यासाठी तो त्यांच्या घरी पाणक्याच्या रुपात राबत होता किती अद्‌भुत ही लीला!

आता यापुढे भक्ताची योगसाधना / उपासना आणखी प्रगत होऊन पूर्णत्वास पोहोचली की ते 'आत्मतत्त्व' भोक्त्याच्या पुढची अंतिम भूमिका घेते आणि ती म्हणजे साक्षात् महेश्वराची! अशा स्थितीत (अवस्थेत) भक्ताला वा साधकाला आत्म-अंतरंगात साक्षात् महेश्वराचेच (ज्ञानचक्षूंनी) दर्शन अनुभवास येते आणि तो साधक, वेदविद्येत सांगितलेला अंतिम पुरुषार्थच प्राप्त करून घेतो आणि खऱ्या अर्थाने मुक्त जीवन (उर्वरित आयुष्यात) जगतो. (जीवनमुक्त अवस्थेत जगतो) आणि देह त्याग केल्यावर, परब्रह्मात विलीन होतो म्हणजेच ब्रह्मीभूत होतो, मोक्ष पावतो किंवा वैकुण्ठधामास पोहोचतो. (व जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती पावतो.)

**उपसंहार -**

मानव सोडून इतर जीवांत 'ईशतत्त्व' वैश्वानर या मर्यादित रुपातच वास करीत असते. सर्वभूतांत 'मानव' ही अंतिम विकसित योनी आहे. त्याला परमश्वराने स्वतंत्र विचार करू शकणाऱ्या मन, बुद्धी आणि अहंकार या तीन गोष्टी बहाल केल्या आहेत व आपल्या बुद्धीप्रमाणे विचार-आचार करण्याचे स्वातंत्र्यही माणसाला दिले गेले आहे. त्यामुळे आपल्या बऱ्या-वाईट कर्मानुसार तो आपला उद्धारही करु शकतो. त्याप्रमाणेच स्वतःला अधोगतीसही नेऊन ठेवू शकतो. माणसाला त्याच्या कर्मानुसार योग्य ती फळे मिळवून देण्यासाठी त्याच्या सर्व बऱ्या-वाईट कर्मांची निष्पक्षपणे नोंद करण्याची

गरजही उत्पन्न झाली. म्हणून 'ईशतत्त्व' जे आत्मरुपात मानवी अंतरात प्रतिष्ठित असते, त्याला सर्व जीवांतील त्याच्या 'वैश्वानर' या भूमिकेव्यतिरिक्त मानवी अंतरंगात उपद्रष्ट्याची आणखी एक भूमिका घेऊन प्रतिष्ठित रहाण्याची गरज निर्माण झाली. म्हणून मानवी अंतरातले 'आत्मतत्त्व', मानवाच्या कर्मांचा (हेतूसहित) संपूर्ण आलेख नोंदवून तो चित्रगुप्तांकडे पाठविण्याचे काम निरंतर करीत रहाण्यासाठी 'उपद्रष्ट्याची' ही भूमिका घेऊन ते तेथे प्रतिष्ठित आले. रावापासून रंकापर्यंत पंडितापासून मुर्खापर्यंत सर्व मानवांत (केवळ साक्षीरुपाने) 'उपद्रष्टयाच्या' भूमिकेत ते 'आत्मतत्त्व' कार्यान्वित असते. असे जरी असले तरी मनुष्याने 'श्रेयं मार्ग निवडला व त्याची परमार्थ मार्गावर (योग्य दिशेने) प्रगती होऊ लागली की त्याचे ईशाशी असलेले नाते कसे विकसित होत जाते व त्याप्रमाणे ते 'आत्मतत्त्व' केवळ प्रतिष्ठित उपद्रष्ट्याच्या भूमिकेच्या पुढे जाऊन क्रमाक्रमाने आणखी नव्या भूमिका कशा घेत जाते, व शेवटी 'महेश्वरी' रुपात त्याच्या ज्ञानचक्षूंना कसे दर्शन देते, ही गूढ प्रक्रियाच या गीतेच्या श्लोकात उघड करून दाखविली आहे.

येथे 'ईशावास्यमिरं सर्वं' या वेदविद्येच्या दुसऱ्या महत्त्वाच्या सिद्धान्तावरचे विवेचन समाप्त झाले.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

पन्नास वर्ष हा कोणा हि मनुष्याच्या आयुष्यात महत्त्वाचा व मोठा कालखंड असतो. त्यानंतर मात्र बहुतेकांची वाटचाल हळूहळू निवृतीच्या दिशेने होताना दिसते. संस्थांच्या आयुष्यात हा कालखंड महत्त्वाचा व मोठा असतोच पण त्यानंतर संस्थांच्या वाटचालीची गती वेगाने वाढवण्याची जबाबदारी त्या काळात संस्थेत कार्यरत/ सहभाग असणाऱ्या प्रत्येकाची असते. याची जाणीव ठेऊन खालील निवेदन सद्धर्मचे सर्व वाचक, देणगीदार व हितचिंतक यांच्या समोर मांडत आहोत. तरी सर्वांनी त्यांचा विचार करून यात सर्वजण सक्रिय सहभाग घेतील असा विश्वास आहे.

१. आपणास सध्दर्म त्रैमासिकाचे स्वरूप, मजकूर, विचार, योग्य वाटत असतील,पटत असतील तर आपण आपल्या संपर्कातील आपल्या मित्र, आप्तेष्ट, व समविचारी लोकांपर्यन्त ते पोचविण्याच्या कामी आपापल्यापरीनें प्रयत्न व मदत करावी अशी विनंती आहे.

२. एप्रिल २०१६ अंकापासून सध्दर्म त्रैमासिकाचे स्वरूप, मजकूर, विचार, या बाबत सर्व वाचक, देणगीदार व हितचिंतक यांना, त्यांच्यासूचना, सल्ला सध्दर्म कडे पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे. तसेच यांत इतर विषयांवरचा वाचकांचा पत्रव्यवहार हि अपेक्षितआहे. त्यातील योग्य, व्यवहार्य सूचना, सल्ला यांचे स्वागत केले जाईल व निवडक विषयांवरचा वाचकांचा पत्रव्यवहार यथावकाश सध्दर्म-त्रैमासिकांत प्रसिद्ध केला जाईल. या बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संपादक व कार्यकारी विश्वस्त यांचा असेल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- संपादक व कार्यकारी विश्वस्त**

## कौटिल्यीय अर्थशास्त्र - 'राष्ट्र संकल्पना'

डॉ. वैशाली दाबके

(लेख १ ला)

कौटिल्यीय अर्थशास्त्राची पार्श्वभूमी पाहिल्यावर आता पुढील लेखांमध्ये, कौटिल्यीय अर्थशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पना आणि विषयांचा परामर्श घेतला जाणार आहे. त्यापैकी 'राष्ट्र' या संकल्पनेचा विचार प्रस्तुत लेखात केला आहे.

कोणत्याही राजनीतिविषयक ग्रंथात केंद्रवर्ती विषय असतो तो म्हणजे 'राष्ट्र'. कारण राजनीतिशास्त्र म्हणजे राष्ट्रनिर्मिती आणि राष्ट्राचा कारभार सुव्यवस्थित कसा चालवावा हे सांगणारे शास्त्र आहे. राजा, मंत्री, अर्थव्यवस्था, सुरक्षा व्यवस्था इत्यादी सर्व घटक राष्ट्रसंकल्पनेतच सामावले आहेत. त्यामुळे येथे 'राष्ट्र' संकल्पनेचा विचार प्रथम करणे उचित ठरते.

कौटिल्यीय अर्थशास्त्रातही, अर्थातच 'राष्ट्र' हीच संकल्पना मुख्य आहे. आणि ते स्वाभाविक ही आहे, कारण प्रबळ परकीय शत्रूंना सामोरे जाण्यास समर्थ अशी एकछत्री राज्यसत्ता उभी करण्याच्या उद्देशानेच चाणक्याने चंद्रगुप्ताला हाताशी धरुन संघर्ष उभारला आणि सिद्धीस नेला. परंतु कौटिल्यीय अर्थशास्त्रात राष्ट्रसंकल्पनेचे विवेचन प्रारंभी न करता ग्रंथाच्या साधारणतः मध्यभागी म्हणजे सहाव्या प्रकरणात केले आहे. या ग्रंथातील 'तंत्र' (अंतर्गत राज्यव्यवस्था) आणि 'आवाप' (परराष्ट्रीय धारेणविषयक विचार) या दोन महत्त्वाच्या विषयांमध्ये राष्ट्र संकल्पना मांडली आहे. अर्थशास्त्राविषयक कोणताही विचार राष्ट्र संकल्पनेशी जोडलेला असतो. चाकाचे आरे ज्याप्रमाणे चाकाच्या केंद्रभागी एकत्र येतात. तद्वत राजनीतिशास्त्रातील सर्व घटक आणि विचार राष्ट्रसंकल्पनेत एकरूप होतात. हेच कौटिल्यीयला सुचवायचे आहे असे वाटते.

मात्र राष्ट्र ही संकल्पना कौटिल्यीयच्या अर्थशास्त्राच्या पूर्ववर्ती ग्रंथांतही दिसून येते. जिचे धागेधोरे थेट वैदिक काळापर्यंत मागे गेलेले दिसतात. ऋग्वेदामध्ये 'राष्ट्र' हा शब्द किंवा ही संकल्पना स्पष्ट मांडलेली नाही. मात्र यदु, पुरु, अनु, तुर्वस इ. विविध जनसमुदायांचे उल्लेख येतात. अशा दहा जनसमुदायांवर सुदास राजान विजय प्राप्त केलेल्या दाशराज्ञ युद्धाचे निर्देश आहेत. हे सर्व निर्देश कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या राजत्तेचे निदर्शक आहेत. 'आपले विचार एक असोत. आली मने एक असोत, आपले ध्येय एक असो' अशी मनीषा व्यक्त करणारे 'संज्ञान सूक्त' एकात्मतेचे निदर्शक आहे. राष्ट्र म्हणजे मोठ्या भूप्रदेशावर प्राप्त केलेले सार्वभौमत्व ही संकल्पना वैदिक काळाच्या नंतरच्या टप्प्यात व वैदिकोत्तर काळात हळूहळू उत्क्रांत झालेली दिसते. अथर्ववेदात राज्याभिषेक राजाची निवड, शत्रूवर वर्चस्व संपादन करणे, स्वीयसेनेचे उत्साहवर्धन, शत्रूसेनासंमोहन असे अनेक विषय हाताळणारे मंत्र दिसतात.

पुढे ब्राह्मण वाङ्मयात केवळ इतर राजांवर नाही तर समुद्रवलयांकित संपूर्ण पृथ्वीवर सत्ता प्रस्थपित करणाऱ्या सम्राटांनी केलेल्या वाजपेय,

राजसूय इत्यादी यज्ञांचे तपशीलवार वर्णन दिसते. महाभारत काळात राष्ट्र ही संकल्पना परिणत अवस्थेत असलेली दिसते. राजसत्तेसाठी भावंडांमध्ये झालेला संघर्ष आणि त्यामध्ये ओढली गेलेली आजूबाजूची लहान मोठी अनेक राज्ये हा तर महाभारताचा मुख्य विषय आहे. महाभारतात राष्ट्र, त्याचे घटक इ. विषयांवर विविध मतेही प्रकट केलेली दिसतात.

कौटिल्याने या पूर्ववर्ती वाङ्मयातील विचारांचा समन्वय साधून राष्ट्र ही संकल्पना साकल्याने आणि नेटकेपणाने मांडलेली दिसते. कौटिलीय अर्थशास्त्रातील 'राष्ट्र' संकल्पनेचा विचार पुढील लेखात पाहू.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

**ऐकावं ते नवलच**

**थडग्यांवर संस्कृत लेख...**

काश्मिरांत अनेक ठिकाणी जुन्या मुसलमानी थडग्यांवर असलेले छोटे छोटे लेख संस्कृतांत आहेत, असे स्टीनसाहेबानी १८९८ च्या सुमारास नमूद करून ठेवले आहे !!!

- Introduction, Rajatarangini, p.131, Foot-note.

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून..**संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार ...**)

अर्थालंकार 'परिसंख्या' साधला आहे. गृह, गृहिणी ह्या व्यंजनसमुहांची परत परत आवृत्ती झाल्यामुळे शब्दालंकार 'छेकानुप्रास' ही साधला आहे. हे दोन्ही अलंकार एकत्र आल्यामुळे 'संसृष्टि' हा अलंकार पण जमला आहे. शेवटी सुभाषितकार म्हणतो ज्या घरात गृहिणी नाही ते घर अरण्याहूनही वाईट. याठिकाणी 'उनसे ही घर घर कहलाया' ह्या हिंदी गाण्याची आठवण होते. छंद अनुष्टुभ

**बृहत्सहायः कार्यान्तं सोदीयानपि गच्छति ।**[३३२]

मोठयांचे सहाय्य घेऊन सामान्य मनुष्य सुद्धा आपला कार्यभाग पूर्णतेला नेऊ शकतो.

संपूर्ण सुभाषित -

**बृहत्सहायः कार्यान्तं क्षोदीयानपि गच्छति ।**
**सम्भूयाम्भोधिमभ्येति महानद्या नगापगा ।**

वरील सामान्य नियमाला उदाहरण पर्वतात उगम पावणाऱ्या निर्झरिणीचे (लहान नदीचे) दिले आहे. ही नदी गंगेला मिळून गंगेबरोबर शेवटी सागरात विलिन होते. हा पण अर्थान्तरन्यास अलंकार असून छंद अनुष्टुभ आहे.

वरील सुभाषिते सुप्रसिद्ध अलंकार शास्त्रावरील ग्रंथ 'कुवलयानन्द' (अपय्य दीक्षित) 'साहित्यदर्पण' (विश्वनाथ) व काव्यप्रकाश (मम्मटाचार्य) ह्या ग्रन्थातून घेतली आहेत. इतिशम् । क्रमशः

**दि. दा. औटी**

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

शकत नाही. त्याला त्याच्या देव संकल्पनेपासून, दैनंदिन जीवन शैलीपर्यंत कुठलेही 'आचार्य' किंवा 'पंथ' स्विकारण्याची मुभा आहे. म्हणूनच घटनेलाही ''हिंदू कोण?'' याची व्याख्या नकारार्थी करावी लागते. उच्चतम न्यायालयानेही (बुधवार, १६ डिसेंबर २०१५) नुकत्याच दिलेल्या एका निकालामधेही हिंदूधर्माबद्दल सांगताना,

"It is a religion that has no single founder, no single scripture and no single set of teachings. It has been described as Sanatan Dharma, namely, eternal faith, as it is the collective wisdom and inspiration of the centuries that Hinduism seeks to preach and propagate."

असे म्हणावे लागलेले आहे.

जगातले सगळे 'पवित्र' ग्रंथ आणि 'वास्तव' यामध्ये कालांतराने फार मोठी दरी निर्माण होते. हे पवित्र ग्रंथ प्रेषितांनी लिहिलेले असल्यामुळे त्यांच्यामध्ये कुठलाही 'बदल' करण्याचा 'अधिकार' हा त्यांच्या अनुयायांना नसतो. या भूमिकेमुळे अनुयायांना एकतर कट्टरपंथी व्हावे लागते, किंवा पंथ सोडून जावे लागते.

'भारतीय घटने'च्या बाबतीत त्याचा 'शिल्पकार' किंवा 'प्रेषित' ठरवतांना, किंवा त्याला रुढार्थाने 'पवित्र ग्रंथ' करण्याआधी, त्याच्या निर्मितीचा इतिहास बघणे हितकारक ठरेल.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. इ.स. १६०० च्या आधी बहुतेक उत्तर हिंदुस्थान हा मोगलांच्या अधिपत्याखाली आणि इ. स. १६०० नंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या वसाहतवादी राज्ययंत्रणेखाली आला. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर इंग्लंडच्या राणीचे राज्य भारतावर चालू झाले. इंग्लंडमध्ये राणीचे राज्य असले, तरी राज्यकारभार हा त्यांची लोकसभा आणि राज्यसभेच्या माध्यमातूनच चालत असे. तेव्हा आणि आजही इंग्लंडला लिखित राज्यघटना नाही. १८५८ पासून ते १९४६ पर्यंत अनेक टप्प्यांवर, स्वातंत्र्यलढ्याचा एक प्रभाव म्हणून भारतीयांना त्यांचे राज्य चालवण्याकरता अनेक अधिकार मिळू लागले. याकरता अनेक समित्या स्थापन झाल्या. भारतीय घटनेच्या निर्मितीमध्ये या इतिहासाचा फार मोठा वाटा आहे.

नोव्हेंबर १९४६ ला भारताच्या 'घटना सभे'ची (Constituent Assembly) निर्मिती झाली. त्याची पहिली सभा ९ डिसेंबर १९४६ ला झाली. डॉ. सच्चिदानंद सिन्हा हे त्याचे त्यावेळचे प्रभारी अध्यक्ष होते. पुढे डॉ. राजेंद्र प्रसाद त्याचे अध्यक्ष झाले. एच. सी. मुखर्जी हे त्याचे उपाध्यक्ष होते. बी. एन. राव (B.N. Rau) यांची घटना सल्लागार म्हणून समितीवर नेमणूक झाली. समाजातल्या सगळ्या घटकांना प्रतिनिधित्व देण्याकरता सुमारे ३८९ सभासदांचा या घटना समितीमध्ये अंतर्भाव केला गेला. सुमारे ३ वर्षांच्या कालावधीमध्ये ११ वेळा समितीच्या बैठका झाल्या. ही घटना बनवताना ६० देशांच्या घटनांचा विचार केला गेला. राष्ट्रभाषेपासून, न्यायदान, व्यक्ती स्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र ते अगदी आरक्षणाच्या मुद्यांपर्यंत सर्व सभासदांनी आपले विचार मांडले. पं. नेहरु, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. आंबेडकर आणि कृष्णास्वामी अय्यर या सगळ्यांचा हा मसुदा बनवण्याकरता मोठा हातभार लागला. घटना सल्लागार श्रीयुत राव यांनी त्याचा एक संकलित मसुदा तयार करुन फेब्रुवारी १९४८ साली तो घटना समितीला सादर केला. डॉ. आंबेडकर हे या मसुदा समितीचे

अध्यक्ष होते. सुमारे १ वर्ष या मसुद्यावर चर्चा झाली. आलेल्या सुमारे २००० सूचनांचा विचार केला गेला, आणि त्यातल्या काहींचा स्वीकारहि झाला. डॉ. आंबेडकरांनी त्याचे सर्व संकलन करुन तो मसुदा घटना समिती पुढे मांडला, आणि २६ नोव्हेंबर १९४९ ला त्या मसुद्याचा समितीने 'भारताची घटना' म्हणून स्वीकार केला.

२४ जानेवारी १९५० ला घटनासमितीची शेवटची बैठक बोलावण्यात आली. एच. व्ही. आर. अय्यंगार यांनी डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे नाव पहिले राष्ट्रपती म्हणून सुचवले, आणि त्यांची त्याकरता एकमतांनी निवड झाली. २६ जानेवारी १९५० ला, हाच 'मसुदा' भारताची 'राज्यघटना' म्हणून अंमलात आला.

२४ जानेवारीच्या सभेमध्ये घटनासभेच्या सर्व सभासदांनी त्या हस्तलिखित मसुद्याखाली सह्या केल्या. अर्थातच पहिली सही जवाहरलाल नेहरु यांची होती. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सगळ्यात शेवटी सही करण्याचे नाकारले. शेवटी सर्वसंमतीने हस्तलिखित घटनेची शेवटची ओळ आणि नेहरुंची सही यामध्ये असलेल्या लहान जागेमध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपली सही केली. अधिकार आणि श्रेष्ठत्वाच्या बाबतीत पंतप्रधानांच्या वरती राष्ट्रपती आहेत हेच बहुधा राजेंद्र प्रसाद यांनी यातून दाखवून दिले. ९०,००० शब्द असलेल्या घटनेची ही प्रत इंग्रजी आणि हिंदीमध्ये आहे. भारताच्या लोकसंख्येचा विचार करता, गरिब आणि वंचितांमध्ये ही भाषा जाणणारे संख्येने फारच अल्प होते. इंग्रजी शिक्षित समाजाच्या उच्च वर्गालाच इंग्रजी भाषा सोईची होती. हा झाला या घटना निर्मितीचा इतिहास. कुठलाही 'धर्म', 'पंथ' किंवा 'व्यक्ती' यांचा या मसुद्यामध्ये उल्लेख नाही. 'निधर्मी'पणा हे त्याचे वैशिष्ट म्हणून आग्रहाने सांगितले जाते. 'घटना समिती' ही या घटनेची 'शिल्पकार' आहे. कुठल्याही एका व्यक्तीने ती लिहिलेली नाही. या हस्तलिखित घटनेचे आणखीन एक वैशिट्य म्हणजे, हस्तलिखित घटनेच्या पानांवरती असलेले नक्षीकाम. त्यांची शैली ही अजंठा लेण्यांमधील भिंतीचित्रांशी जुळणारी आहे.

ही भारतीय घटना बहुतांशी पाश्चात्य देशांच्या घटनांच्या मसुद्यामधील चांगल्या गोष्टी एकत्रित करुन बांधलेली 'गोधडी' आहे. वास्तविक वेद, उपनिषद, वेदांग, दर्शने, धर्मशास्त्र, स्मृती, रामायाण, महाभारत, बौद्ध आणि जैन दर्शन या भारतीय संस्कृतीच्या मार्गदर्शक साहित्याचा यामध्ये अंतर्भाव नाही. पंचतंत्रापासून नीतिग्रंथांपर्यंत अनेक ग्रंथांनी 'भारतीय' मानसिकता आणि व्यक्तीमत्व बनवले आहे. स्थापत्यापासून ते नृत्यापर्यंतच्या सगळ्या भारतीय कलांवरती त्यांचा प्रभाव आहे. दुर्दैवाने घटना समितीला यातील 'शाश्वत' विचारांची त्यातील 'संदर्भ' देऊन नोंद घ्यावीशी वाटली नाही. 'स्वातंत्र्य', 'समता' आणि 'बंधुता' यांचे प्रतिबिंब, ३ ते ५ हजार वर्षाच्या या साहित्यामध्ये अनेक ठिकाणी दिसून येते. १७ व्या शतकानंतरच्या 'भारतशास्त्रा'(Indology)च्या अनेक अभ्यासकांनी यावर भरपूर लिखाण करुन ठेवले आहे. ही कमतरता भरुन यावी म्हणूनच की काय, शांती निकेतनचे प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मिळून सुमारे २२ लघुचित्रे (Miniatures) या हस्तलिखित घटनेचा भाग झाली आहेत. ही सर्व लघुचित्रे वर सांगितलेल्या भारतीय इतिहासावर आधारलेली आहेत. यामध्ये श्रीराम, लक्ष्मण, सीता, कृष्ण, अर्जुन, वैदीक काळ, बुद्ध, महावीर,

गुप्त मौर्य घराणी, नद्या, पर्वत ते अगदी अक्बरापासून, राणी लक्ष्मीबाई, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस या सगळ्यांचा त्यामध्ये समावेश आहे.

भारतीय घटना ही जगातील सर्वांत मोठी राज्यघटना आहे. आपले न्यायदान आणि राज्यकारभार हा या घटनेच्या आधारावरच चालतो. भारत हे एक लोकशाही 'प्रजातंत्र' आहे. घटनेच्या निर्मितीनंतर नवीन कायदे करण्याचा अधिकार हा या प्रजेमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनाच आहे. पण भारताच्या नागरिकत्वापलिकडे, लोकप्रतिनिधी होण्याकरता कुठलीच पात्रता लागत नाही. निवडणुकीत संख्या बळावर लोक प्रतिनिधी निवडले जातात. दिल्लीपासून गल्लीपर्यंत निवडून आलेल्या आपल्या लोकप्रतिनिधींमध्ये ५०% च्या जवळपास सभासदांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. यामध्ये खून, बलात्कार आणि अपहरण अशा गंभिर गुन्ह्यांचाही समावेश आहे. उच्च शिक्षणाची पात्रता असलेले फारच कमी प्रतिनिधी निवडून येतात. या सगळ्यांनी आपला एक विशिष्ठ 'वर्ग' बनवला असून, सामान्य नागरिकाला लागू पडणारे अनेक नियम यांना लागू होत नाहीत.

'गरीब' आणि 'वंचितां' करता आरक्षणाचा कायम आग्रह धरणारे हे बहुसंख्य राजकिय लोकप्रतिनिधी मात्र 'कोट्याधिश' आणि 'लक्षाधिश' आहेत. जनता आज कितीहि 'असुरक्षित' असली, तरी दिल्लीपासून, गल्लीपर्यंतचे हे लोकप्रतिनिधी मात्र, पुढे मागे बंदूकधाऱ्या रक्षकांची फौज घेऊन फिरतांना दिसतात. 'जातीयवाद' म्हणजेच 'वर्ग' वादाला मूठमाती देणारी आपली 'निधर्मी', 'समाजवादी' घटना, या नवीन 'राजकीयवर्ग' वादाला संमती देते असाच याचा अर्थ आहे कां? कारण हे सर्वच आपल्या 'पवित्र' घटनेचा आधार घेऊनच होत आहे. तुम्हांला आम्हांला नाक्यावर टोल द्यावा लागतो. यांना मात्र त्यापासून मुक्ती आहे. ही सगळीच यंत्रणा भ्रष्टाचाराने किती बरबटलेली आहे हे आपण सगळे जण अनुभवत आहोतच. या घटनेचे सर्वात मोठे वैशिष्ठ 'कायद्याचे राज्य', म्हणजे कायद्यापुढे सगळे समान हे आहे. 'नोकरशहा' किंवा 'सत्ताधाऱ्यां' पुढे घटनेनुसारच कायदा किती लवचिक होतो हा आपला रोजचा अनुभव आहे. चांगल्याची 'ठिगळं' लावत किंवा संहिता जाळून कुठलीच संहिता किंवा राज्यघटना 'पवित्र' होत नाही. 'अंतर्मुख' करायला लावणाऱ्या सगळ्याच 'संहिता' किंवा 'घटना' पवित्र होतात.

'धर्म', 'जात', 'लिंग' असा भेदभाव भारतीय नागरीकांमध्ये केला जाणार नाही अशी ग्वाही भारतीय घटना देते. पण याच घटनेचा आधार घेत ५०% भारतीयांना आरक्षण मिळते. १९५० नंतर चार-पाच पिढ्या हे आरक्षण मिळाल्यावरही त्यांच्या आजच्याही पिढ्या तेवढयाच गरीब, मागासलेल्या आणि वंचित आहेत, हे समजून घेणे कठीण आहे. आतातर शालेय शिक्षणात २५% आरक्षण हे जातीवर आणि आर्थिक मागालेपणावर दिले जाणार आहे. म्हणजे जन्मापासून जातीचा दाखला अनिवार्य आहे. जाती निर्मूलनासाठी जातीयवाद भक्कम करणारा हा कार्यक्रम अजबच म्हणायला हवा. भारत हा जगातला एकच देश असेल की जेथे आम्ही 'मागासलेले' आहोत हे सांगण्याची चढाओढ लागते. घटनेनुसार 'घराणेशाही' ला तर कुठेही स्थान असू शकत नाही. 'पवित्र' घटनेचा आधार घेतच, आज या देशामध्ये केंद्रापासून खेड्यापर्यंत, 'सत्तेची ऊब' ही घराणेशाहीलाच मिळत असल्याचे आपण उघड्या डोळ्याने पहात आहोत. जगातल्या सगळ्या चांगल्याची उसनवारी करून बांधलेल्या या

घटनेमध्ये गेल्या ६५ वर्षांत शंभरहून आधिकवेळा बदल करावे लागले. यातले अनेक बदल तर मूलभूत आहेत. 'गरीब' आणि 'वंचितां'ना न्याय देण्याकरता घटनेनुसार स्थापन झालेल्या न्यायालयातून सर्व व्यवहार मात्र इंग्रजीमधून चालतात. केवढा विरोधभास हा !!

'वास्तवाची' आपल्या घटनेपासून झालेली फारकत समजावून घेण्याकरता हा इतिहास माहित असणे आवश्यक आहे. घटनसमितीच्या ३८९ सभासदांनी घटना बनवतांना केलेली चर्चा ही ६ खंडांमध्ये आज उपलब्ध आहे. राजकीय 'सोय' म्हणून सुद्धा अशा राज्य घटनेला 'धर्मा'चे किंवा 'पवित्र' ग्रंथाचे स्थान देणे म्हणूनच धोकादायक आहे. घटनेमुळे नागरिक सुधारत नाही तर 'प्रबुद्ध' नागरिकच संपन्न राष्ट्र निर्माण करू शकतो. त्याकरता गरज असते ती 'चारित्र्य' घडवण्याची. अशा समाजाची निर्मिती करणाऱ्या यंत्रणेलाच आपल्या परंपरेमध्ये 'धर्म' म्हटले आहे. त्याचा 'एक' शिल्पकार म्हणजे 'प्रेषित' किंवा 'पवित्र ग्रंथ' नसतो. अनेक वर्षांच्या अनुभवातून विकसित होत जाणारी ती 'प्रेरक' प्रक्रिया असते. म्हणूनच मनुनी सांगितलेली धर्माची १० लक्षणे आजच काय पण सदासर्वकाळ शाश्वत रहातील.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥
मनुस्मृती ६/९२.

याच मनुला आपण अग्नीच्या तोंडी दिला आहे. बिचारा मनु !!

आज अस्तित्वात आहे तो 'वकिली' तर्कवाद आणि 'बुद्धीवादा'चा आधार घेत, गुन्हेगारांच्या पाठिशी उभा असलेला 'घटना' नावाचा 'पवित्र' ग्रंथ. सामान्य माणूस आणि हा 'पवित्र' ग्रंथ यामध्ये एवढी दरी आहे की, 'वकील' नावाची महागडी शिडी लावल्या शिवाय तो त्यापर्यंत पोहचूंच शकत नाही.

मनूने सांगितलेली धर्माची १० लक्षणे ही सुद्धा मुळात मनुची नाहीत. वेद, दर्शने, रामायण, महाभारत, बौद्ध आणि जैन पंथांमधूनही याच लक्षणांचा पुरस्कार केला आहे. म्हणूनच ती 'सनातन' आणि 'पवित्र' आहेत. त्याच्या अंमलबजावणी करता कुठल्याही वकिल किंवा दलालांची गरज नाही. या आणि अशा मूल्यांचा 'स्वीकार', 'प्रसार' आणि 'व्यवहार' करणारी प्रत्येक 'व्यक्ती' आणि 'ग्रंथ' हा भारतीयांना 'पवित्र' आहे. या अपौरुषेय मूल्यांमुळेच सदाचारी, विवेकी आणि सहिष्णू समाज निर्माण होते. समाजातल्या सगळ्या स्तरांना कळेल अशा सोप्या भाषेत, दृष्टांतांचा आधार घेत, भारतातील सर्व संत आणि महंत याच मूल्यांचा प्रसार करतांना दिसतात. म्हणूनच त्यांचे साहित्यही भारतीयांना 'पवित्र' आहे. राजाला किंवा रंकाला तीं मूल्यें सारखीच लागू आहेत. मतांचे राजकारण किंवा कायद्याच्या सक्तीतून हे 'पावित्र्य' लादता येत नाही. भारतीयांच्या या धर्माला, कोणी एक 'प्रेषित' नाही, किंवा एकच 'पवित्र' ग्रंथ का नाही, हे समजून घेणे म्हणूनच महत्वाचे आणि गरजेचे आहे.

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१